cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–७८ | रविवार, दि.१३ जुलै २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

१२ वी सायन्स उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांना बी. टेक. (फूड टेक.) तसेच बी.एस्सी. (ऑनर्स) ॲग्रीकल्चर पदवी घेवून सर्व क्षेत्रात हमखास १००% नोकरीची संधी.
आतापर्यंतच्या उत्तीर्ण सर्व बॅचेसचे १००% प्लेसमेंट
"अ" दर्जा प्राप्त सौ.के.एस.के. (काकू)
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी मान्यताप्राप्त
अन्नतंत्रज्ञान आणि कृषि महाविद्यालय
म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड – ४३१ १५३
कॉलेज ऑप्शन नंबर - बी. टेक. (फूड टेक.) - १६१७७ आणि बी.एस्सी (ऑनर्स) ॲग्री - ११२१३.
फॉर्म भरताना विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयाचा ऑप्शन एक नंबरला देणे
ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरण्याचा अंतिम दि. १७ जुलै २०२५
प्रवेशासाठी संपर्क कार्यालय :- सागर हाईट्स, बस स्टँड समोर, बीड - ४३१ १२२
संपर्क क्र. :- ९४२००२५०५२ / ९७६३४३४५०४ / ९९७०८४२०१४ / ७५८८०८२०३४ / ९९४१००१२१२

## संपादकीय

### विरोधी पक्षनेतेपदाचा तिढा

विधिमंडळात विरोधी पक्षनेतेपदाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. विरोधी पक्षनेतेपदावर आक्रमक होऊन महाविकास आघाडीतील आमदारांनी मंगळवारी घोषणाबाजी केली. विरोधी पक्षनेता निवडीत विधानसभा अध्यक्ष टाळाटाळ करीत असल्याचा आरोप करीत विरोधकांनी सभात्याग केला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विरोधकांचे आरोप फेटाळून लावले. विरोधी पक्षनेता निवडीबाबत पत्र देण्यासाठी तुम्हाला चार महिने लागले. मग निर्णय घेण्यासाठी आम्हाला थोडा वेळ लागला तर गैर काय?

# मराठवाड्यात कापसाचा पेरा घटला!

## पावसाच्या खंडासह खर्च निघत नसल्याने शेतकऱ्यांनी फिरवली पाठ

**बीड । प्रतिनिधी**

**यंदा जून महिन्याच्या सुरुवातीला चांगला पाऊस होईल असे वाटत असताना बऱ्याच भागात १५ ते २० दिवसापासून पाऊस नसल्याने लागवड केलेली कपाशी उगवली नाही तर काही भागात पाऊस नसल्याने शेतकऱ्यांनी कापसाकडे पाठ फिरवली आहे. त्यामुळे मराठवाड्यात यंदा कापसाचा पेरा घटला असल्याचे चित्र आहे.**



### कापसाकडे का फिरवली पाठ?

कापसाला मेहनत, खर्च आणि पाणी या गोष्टी अधिक लागतात. लहरी पाऊस, जमिनीतील पाण्याची पातळी कमी होणे यामुळे कापसासाठी पाण्याचे नियोजन करणे अवघड झालेले आहे. तर कापसावर बोंडअळीचा प्रादुर्भाव ही मोठी अडचण आहे. कापसासाठी अधिकची मजूरी, खर्च, खतं आणि किटकनाशकांवर खर्च होतो. तर बाजार भावासाठी ताटकळत थांबावे लागते. योग्य दर न मिळाल्याने शेतकऱ्यांना कापसाकडे पाठ फिरवली आहे.

कापसाचे पिक हे शेतकऱ्यांसाठी नगदी पिक असले तरी वर्षभर करावी लागणारी मेहनत आणि कमी मिळत असलेला दर यामुळे यंदा शेतकऱ्यांनी कापसाच्या पिकाकडे पाठ फिरवली असल्याचे दिसत आहे. याबरोबरच सरकारी यंत्रणांची निष्क्रियता यासाठी कारणीभूत आहे. कापसाला शेतकऱ्यांनी पर्याय शोधला आहे. गेल्या पाच वर्षांपासून कापसाला भाव नाही, पान २ वर

## रेल्वेत नोकरी देतो म्हणून परळीतील बेरोजगाराची २४ लाखांची फसवणूक

**परळी । प्रतिनिधी**

**रेल्वे खात्यात नोकरी लावतो म्हणून नियुक्तीपत्र, ट्रेनिंग, मेडिकल अशी सर्व प्रक्रिया पार पडल्याचे भासवत परळी येथील २१ वर्षीय महादेव भरत मुंडे या युवकाची तब्बल २४ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी संभाजीनगर परळी पोलीस ठाण्यात काशीनाथ घुगे, सचिन वंजारे, संजय ठाकूर (रा.दिल्ली), सुरजकुमार सिंग (अमृतसर, पंजाब) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

नोव्हेंबर २०२३ मध्ये त्यांच्या वडिलांचे ओळखीचे असलेले काशीनाथ भानुदास घुगे (रा. शिवाजीनगर, परळी) यांनी त्याला रेल्वे खात्यात नोकरी लावतो असे सांगून विश्वासात घेतले, ५ डिसेंबर २०२३ रोजी ते महादेवला दिल्लीला घेऊन गेले व तेथे त्याचे मेडिकल करण्यात आले. यानंतर, सचिन नारायण वंजारे (रा. परळी) यांच्या खात्यावर दोन दिवसात एकूण १ लाख रुपये पाठविण्यात आले. त्याच्या मोबदल्यात महादेवला रेल्वेच्या गेटमन पदाचे बनावट नियुक्तीपत्र दिले गेले.पुढे अमृतसर येथे जाऊन ट्रेनिंगची प्रक्रिया सुरू झाली. परंतु नंतर, रेल्वे क्वार्टर मिळवण्यासाठी आणखी ३ लाख रुपये मागण्यात आले. महादेवच्या वडिलांनी आपल्या खात्यातून ९० हजार रुपये काशीनाथ यांना पाठवले. अमृतसर येथे सुरजसिंह नावाच्या इसमाशी संपर्क करून गेट क्र. २६ वर ट्रेनिंग सुरू झाली. पुढील टप्प्यात महादेवकडून संजय ठाकूर, मनिष यादव, एस. के. सिंग या व्यक्तींनी वेळोवेळी संपर्क करून ५० हजार ते ६ लाखांपर्यंतची रक्कम पान २ वर

# तीन 'संजय' मुळे दोन्ही सेनेची कोंडी



**बीड । प्रतिनिधी**

**राजकारणात कधी काय घडेल हे भल्याभल्याना सांगता येत नाही अनेक वेळा राजकीय आरोपाच्या फैरी आपण पहिल्या अन ऐकल्या पान राजकारणातील संजय राऊत ,संजय गायकवाड आणि संजय सिरसाट या तीन संजय मुळे दोन शिवसेना मात्र त्रस्त झाल्याचे दिसते तिघेही संनसनी करण्यात माहीर पन पक्षनेत्रत्वाला त्याची सारवासारव करण्याची कसरत कारवी लागत आहे.**

संपत्तीत वाढ झाल्याबद्दल प्राप्तिकर विभागाच्या नोटिशी पाठोपाठ बॅगेत नोटांची बंडले असल्याची चित्रफीत समोर आल्याने सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. आमदार संजय गायकवाड यांनी आमदार निवासात केलेली मारहाण आणि शिरसाट यांच्यावर दररोज होणारे आरोप या दोन 'संजय'च्या प्रतापामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची डोकेदुखी वाढली आहे.तर तिसरे संजय हे उद्जहावं ठाकरे यांच्या शिवसेनेचे आहेत तेही दरदिवशी नवीन प्रकरण पुढे करून सन्सनी निर्मण करतात राज्यात शिवसेना राष्ट्रवादी आणि काँग्रेसचे महाविकास आघाडीचे सरकार आणण्यात खा संजय राऊत यांचा मोठा वाट होता आणि सरकार पाडण्यात देखील त्यांचाच वाटा मोठा असल्याचे शिंदे सेनेचे आमदार बोलत आहेत पक्ष फुटीला संजय राऊतच जबाबदार असल्याचे बोलतात या एका संजय मुळे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे अनेकदा अड्चणतीत आले विरोधकांचे पान २ वर

## थोडक्यात...

### गेवराई शहरात भरदिवसा लांबवले दीड लाख

गेवराई –शहरामध्ये चोऱ्याचे प्रमाण वाढले असून भरदिवसा चोऱ्या होऊ लागल्या आहेत. शहरातील कोल्हेर रोडवर उभ्या असलेल्या एका कारची काच फोडून तब्बल दीड लाख रुपये लंपास केले आहेत. किनगाव येथील महारुद्र चाळक यांनी बँकेतून दीड लाख रुपय काढले होते. ते पैसे त्यांनी आपल्या गाडीत ठेवले आणि गाडी कोल्हेर रोडवर पार्क केली असता अज्ञात चोरट्याने गाडीची काच फोडून दीड लाख रुपयांची चोरी केली आहेत.

### ३० सप्टेंबरपर्यंत नवी मुंबई विमानतळ सुरु होणार– मुख्यमंत्री

नवी मुंबई– येथील विमानतळ कधी सुरु होणार याविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माहिती दिली आहे. ते म्हणाले, काही विमानतळावर एक एक किलोमीटर पायी चालावे लागते. इथे ट्रॅव्हलेटर तयार करण्यात आले आहे. देशातील सर्वात आधुनिक एअरपोर्ट तयार होणार आहे. ३० सप्टेंबरपर्यंत विमानतळ पूर्ण करण्याचे टार्गेट दिले आहे. पंतप्रधानांचीही वेळ घेणार आहे. १३ ते १४ हजार कामगार रोज काम करत आहे. कामगारांची संख्या दुप्पट तिप्पट वाढवायला सांगितली आहे.

### ठाकरेंच्या शिवसेनेचा बच्चू कडूंच्या यात्रेला पाठिंबा

मुंबई–ठाकरे गटाचे नेते आमदार भास्कर जाधव हे बच्चू कडूंच्या सातबारा कोरा यात्रेच्या समारोप सभेला उपस्थित राहणार असून येत्या १४ तारखेला यवतमाळ जिल्ह्यातील आंबोडा येथे सातबारा कोरा यात्रेची समारोप सभा होणार आहे. या यात्रेला ठाकरे सेनेचा पाठींबा असल्याने ही सभा गाजणार असल्याचे दिसते.

### जनसुरक्षा कायद्यावर राऊत यांची टीका

मुंबई–शिवसेना उबाठा नेते संजय राऊत यांनी जनसुरक्षा कायद्यावर टीका केली आहे. हा कायदा जनहितासाठी नाही तर भाजपसाठी आहे. हा भाजप सुरक्षा कायदा आहे. या कायद्याला आमचा विरोध असणार आहे, असे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

### होमिओपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथी उपचार करण्यास बंदी

मुंबई–होमिओपॅथी डॉक्टरांची ॲलोपॅथी नोंदणी रद्द करण्यात आली असून आयएमएच्या तीव्र विरोधामुळे महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने यू–टर्न घेतला असून येत्या १५ जुलैपासून सुरू होणारी नोंदणी थांबवली आहे. मुख्यमंत्र्यांच्या हस्तक्षेपानंतर तातडीने निर्णय मागे घेण्यात आला असून होमिओपॅथी डॉक्टरांना आता ॲलोपॅथी उपचार करता येणार नाहीत.

### सार्वजनिक ठिकाणी मद्यपान केल्यास कारवाई

मुंबई । प्रतिनिधी

उद्याने, मैदाने सार्वजनिक ठिकाणी मद्यपान केल्यास कारवाई केली जाणार आहे. सार्वजनिक ठिकाणी होणारे मद्यपानाचे प्रकार रोखण्यासाठी आमदारांची समिती नेमली जाणार आहे. या समितीची मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात येईल. त्यानंतर सहा महिन्यात सार्वजनिक ठिकाणी मद्यपानाला मनाई करणारा कायदा केला जाणार असल्याची माहिती मंत्री आशिष शेलारांनी दिली आहे.

## आ. रोहित पवारांविरोधात ईडीकडून पुरवणी आरोपत्र दाखल

**मुंबई । प्रतिनिधीं**



राष्ट्रवादी एसपीचे आमदार रोहित पवारांविरोधात ईडीकडून पुरवणी आरोपत्र दाखल करण्यात आले आहे. मुंबईतील विशेष न्यायालयात हे आरोपत्र ईडीने दाखल केले आहे. त्यामुळे रोहित पवारांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

राज्य सहकारी बँक प्रकरणात आ. रोहित पवार यांच्यावर हे आरोपपत्र दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. ईडीने यापूर्वी देखील रोहित पवारांच्या मालकीच्या बारामती ॲग्रो कंपनीच्या कार्यालयावर छापे टाकले होते. दरम्यान यावेळी ईडीकडून बारामती ॲग्रोची मालमत्ता जप्त करण्यात आली होती. मात्र, ईडीकडून पुरवणी आरोपपत्र दाखल केल्यानंतर रोहित पवारांनी सत्ताधाऱ्यांवर टीकास्त्र डागले आहे. ईडीचे अधिकारी बिचारे आदेशाचे धनी असे ट्विट त्यांनी केले आहे.

## मुरलीधर मोहोळ अनपेक्षितपणे केंद्रात मंत्री झाले

### अमित शहांना भेटण्यासाठी अण्णाला बोलावे लागते; चंद्रकांत पाटलांच्या विधानाची चर्चा





**पुणे । प्रतिनिधी**

अण्णा मंत्री कसे झाले ते समजलेच नाही, ते केंद्रात अनपेक्षितपणे मंत्री झाले असून पुर्वी अमित शहांना भेटण्यासाठी लोक माझ्याकडे यायचे. आता मला सुध्दा मुरलीधर अण्णाकडे जावे लागते, असे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी म्हटले आहे. त्यांच्या या विधानाची सर्वत्र जोरदार चर्चा सुरु आहे. पान २ वर

#### मंत्रिपद मिळेल याची कल्पनाच नव्हती

अण्णा केंद्रियमंत्री राज्यमंत्री आहेत. त्यांच्याकडे जबाबदाऱ्या मोठ्या आहेत. मात्र इथल्या लोकांशी नाळ तोडू नये, असा सल्लाही चंद्रकांत पाटील यांनी मुरलीधर मोहोळ यांना दिला. तर दुसरीकडे मला केंद्रात मंत्रिपद मिळेल याची कल्पनाच नव्हती. हे सगळं अनपेक्षितरित्या झालं, अशा भावना मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केल्या.

## सात जिल्ह्यातून धावणार आणखी एक वंदे भारत



**नांदेड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्राला आणखी एक वंदे भारत ट्रेन मिळणार आहे. मुंबई सीएसएमटी–नांदेड वंदे भारत एक्सप्रेस ट्रेन ऑगस्ट महिन्यापासून धावणार आहे. २६ ऑगस्टपासून नांदेड–संभाजीनगर– मुंबई सीएसएमटी वंदे भारत एक्सप्रेस धावणार आहे. या वंदे भारत एक्सप्रेसमुळे सात जिल्हे थेट मुंबईशी जोडले जाणार आहेत.**

#### २६ ऑगस्टपासून मुंबईहून धावणार नांदेडकडे ट्रेन

मुंबई ते नांदेड दरम्यानचे ७७१ किमीचे पान २ वर

## जयंत पाटील प्रदेशाध्यक्षपदावरुन पायउतार

### शरद पवार शशिकांत शिंदेंकडे सोपवनार जबाबदारी

**मुंबई । प्रतिनिधी**

**गेल्या काही दिवसापासून शरद पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष बदलाचे वारे वाहत होते. त्यानंतर आता जयंत पाटील यांनी पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदावरुन पायउतार होण्याचा निर्णय घेतला असून शरद पवारांनी शशिकांत शिंदे यांच्यावर जबाबदारी सोपवली आहे.**

काही दिवसांपूर्वीच पक्षाच्या कार्यक्रमात जयंत पाटील यांनी मला प्रदेशाध्यक्षपदातून मुक्त करा, अशी मागणी केली होती. त्यानंतर आज अखेर जयंत पाटील यांची ही मागणी पूर्ण झाली आहे. जयंत पाटील यांच्या राजीनाम्यानंतर शशिकांत शिंदे यांची प्रदेशाध्यक्षपदी निवड झाली पान २ वर



## मराठवाड्यातील धरणांमध्ये पाणीसाठा अपुरा

**बीड। प्रतिनिधी**

राज्यातील बहुतांश भागात समाधानकारक पाऊस पडला असला तरी मराठवाड्याला मात्र अजूनही जोरदार पावसाची प्रतीक्षा आहे. नाशिक जिल्ह्याच्या कृपेने जायकवाडी प्रकल्पात ७२ टक्के जलसाठा आहे. मात्र मराठवाड्यातील निम्म्यांवर लघु आणि मध्यम प्रकल्पात २५ टक्क्यांपेक्षा कमी पाणी आहे. मराठवाड्यात ११ मोठ्या प्रकल्पांपैकी तीन प्रकल्पात २५ टक्क्यांपेक्षा कमी पाणीसाठा आहे. तर तीन प्रकल्पात ५०% पेक्षा कमी पाणीसाठा आहे.

## लालपरीला आषाढीत पांडुरंग पावला एसटीला ३५ कोटी ८७ लाखाचे उत्पन्न

**मुंबई । प्रतिनिधी**

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरच्या वारीसाठी एसटी महामंडळाकडून विशेष बस सोडण्यात आल्या. विठ्ठलाच्या सेवेमुळे एसटी महामंडळाच्या उत्पन्नात मोठी वाढ झाली आहे. ९ लाख ७१ हजार भाविकांनी एसटीने प्रवास केला. त्यामुळे महामंडळाला ३५ कोटी ८७ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले. पुणे, मुंबई, नाशिक, नागपूर, संभाजीनगरसह राज्यातील प्रत्येक एसटी विभागातून वारीसाठी स्पेशल एसटी बसेसची सोय करण्यात आली होती. त्यामधून कोट्यवधींचे उत्पन्न मिळाल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. पान २ वर



### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.११ जुलै २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू:२२.५० क्विंटल | २,५२१ | २,६८४ | २,६३५ |
| ज्वारी/हायब्रिड :८७.०० क्विंटल | २,३५१ | २,६८१ | ३,२०१ |
| मका/लोकल: २.५०क्विंटल | २,३०० | २,३०० | २,३०० |
| तूर : २३.०० क्विंटल | ५,७०० | ६,४५१ | ६,१७२ |
| उडीद : १.५० क्विंटल | ४,४०० | ४,८०० | ४,६०० |
| बाजरी: ११.५० क्विंटल | २,६६७ | २,६६७ | २,६६७ |
| मुग :१.०० क्विंटल | ५,००० | ६,२०० | ५,६०० |
| सोयाबीन: ७.०० क्विंटल | ४,२५० | ४,२५० | ४,२५० |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |



# स्व.मुंडेंची तिसरी कन्या यशश्री राजकीय मैदानात!

**बीड । प्रतिनिधी**

**भाजपचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्या तिस–या कन्या यशस्वी मुंडे या राजकीय मैदानात उतरल्या आहेत. बीडमधील परळी येथील वैद्यनाथ अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक निवडणुकीसाठी यशश्री मुंडे यांनी संचालकपदासाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यशस्वी यांच्यासोबत माजी खासदार प्रीतम मुंडे यांनी देखील आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले असून, यशश्री यांच्या उमेदवारीमुळे मुंडे घराण्याचा प्रभाव आणखी वाढण्याची चर्चा आहे.**

पंकजा मुंडे, प्रीतम मुंडे यांच्यानंतर आता यशश्री मुंडे या देखील राजकारणात उतरल्या आहेत. निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या यशश्रींसह माजी खासदार डॉ. प्रीतम मुंडे आणि एकूण ७१ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. ही निवडणूक १७ जागांसाठी होत आहे. १० ऑगस्टला मतदान आणि १२ ऑगस्टला मतमोजणी होणार आहे. उमेदवारी अर्जांची छाननी १४ जुलैला होईल, तर १५ ते १९ जुलै दरम्यान अर्ज मागे घेण्याची मुदत आहे.यशश्री मुंडे यांनी अमेरिकेतील प्रतिष्ठित कॉर्नेल विद्यापीठातून शिक्षण पूर्ण केले आहे. कॉर्नेल विद्यापीठात जगभरातील फक्त ११ टक्के विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळतो. यशश्री यांना पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# विरोधी पक्षनेतेपदाचा तिढा

विधिमंडळात विरोधी पक्षनेतेपदाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. विरोधी पक्षनेतेपदावर आक्रमक होऊन महाविकास आघाडीतील आमदारांनी मंगळवारी घोषणाबाजी केली. विरोधी पक्षनेता निवडीत विधानसभा अध्यक्ष टाळाटाळ करीत असल्याचा आरोप करीत विरोधकांनी सभात्याग केला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विरोधकांचे आरोप फेटाळून लावले. विरोधी पक्षनेता निवडीबाबत पत्र देण्यासाठी तुम्हाला चार महिने लागले. मग निर्णय घेण्यासाठी आम्हाला थोडा वेळ लागला तर गैर काय? असा सवाल करत याबाबत लवकरच निर्णय घेण्याची ग्वाही त्यांनी दिली. मात्र अध्यक्षांच्या भूमिकेवर नाराज झालेल्या विरोधकांनी सरकारविरोधात घोषणाबाजी करीत प्रश्नोत्तराच्या तासावर बहिष्कार टाकला. विधानसभा विरोधी पक्षनेतेपदी शिवसेना गटनेते भास्कर जाधव यांची नियुक्ती करण्याचे पत्र विरोधी पक्षांतर्फे काही महिन्यांपूर्वी विधानसभा अध्यक्षांना देण्यात आले होते. या पत्रावर लवकरच निर्णय घेण्याचे आश्वासन अध्यक्षांकडून दिले जात आहे. विधानसभेत कामकाज सुरू होताच भास्कर जाधव यांनी विरोधी पक्षनेता निवडीचा मुद्दा उपस्थित केला. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या सत्काराचे आयोजन मंगळवारी विधिमंडळात करण्यात आले होते.

त्याचे औचित्य साधत विरोधकांनी विरोधी पक्षनेतेपदाचा मुद्दा रेटून धरला. सरन्यायाधीश विधान भवनात येत असताना त्यांच्या स्वागताला विरोधी पक्षनेता नसणे हे योग्य नाही. सभागृहाचे कामकाज सौहार्दपूर्ण वातावरणात चालावे यासाठी विरोधक सरकारला संपूर्ण सहकार्य करीत आहेत. विरोधी पक्षनेत्यासाठी १० टक्के सदस्यांची कोणतीही अट नसल्याचे विधिमंडळानेच लेखी पत्र दिले आहे. दिल्ली विधानसभेत भाजपचे केवळ तीन सदस्य असतानाही सत्ताधारी आम आदमी पक्षाने भाजपला विरोधी पक्षनेतेपद दिले होते, याकडे जाधव यांनी लक्ष वेधले. राज्यातही यापूर्वीच सात सदस्य असतानाही विरोधी पक्षनेतेपद दिल्याचे जाधव यांनी सांगितले. राष्ट्रवादीचे जयंत पाटील आणि काँग्रेसचे विजय वडेट्टीवार यांनीही जाधव यांच्या भूमिकेशी सहमती दर्शवित विरोधी पक्षनेत्याची खुर्ची रिकामी ठेवणे योग्य आहे का? प्रथा-परंपरा किती दिवस पायदळी तुडविणार? असा प्रश्न करत विरोधी पक्षनेता निवड लवकर करण्याची मागणी केली. विरोधी पक्षनेता निवड हा विधानसभा अध्यक्षांचा अधिकार असून, ते योग्यवेळी निर्णय घेतील. आताच निर्णय घ्या, असे अध्यक्ष किंवा सरकारवर बंधन घालता येणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. आम्ही विरोधी पक्षनेता निवडीसाठी सनदशीर मार्गाने विधानसभा अध्यक्षांना पत्र दिले. मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची भेट घेऊन विरोधी पक्षनेतेपदाबाबत निर्णय घेण्याची विनंती केली. मात्र अध्यक्ष आणि सरकारला प्रथा-परंपरांचा विसर पडला आहे. सनदशीर मार्गाने हा प्रश्न सुटणार नसेल तर बहुमताच्या जोरावर लोकशाहीचा गळा कसा घोटला जातो हे सरन्यायाधीशांना सांगावे लागेल, असा इशारा भास्कर जाधव यांनी दिला. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश विधान भवनात येत असताना विधानसभेचे विरोधी पक्षनेतेपद रिक्त ठेवणा-या सरकारचा महाविकास आघाडीच्या नेत्यांनी विधिमंडळाच्या पाय-यांवर आंदोलन करून निषेध केला. आपला देश हा संविधानाप्रमाणे काम करीत असतो. आपणदेखील संविधानाचे पाईक आहात. त्यामुळे संविधानाची पायमल्ली न होणे ही सर्वांचीच जबाबदारी आहे. आम्हाला माहीत आहे की, विधिमंडळाच्या कामकाजामध्ये न्यायालय हस्तक्षेप करीत नाही. तरीसुध्दा संविधानाचे पाईक म्हणून व लोकशाहीच्या चार स्तंभांपैकी एका स्तंभाचे प्रमुख म्हणून ही बाब आपल्या निदर्शनास आणू इच्छितो, अशा आशयाचे निवेदन विरोधी पक्षाच्या वतीने सरन्यायाधीशांना विधान भवनात देण्यात आले. आमच्या पत्रव्यवहाराला उत्तर देताना सचिवालयाने विरोधी पक्षनेता निवडीबाबत नियम, कायद्यात तरतूद नाही. विरोधी पक्षनेता नियुक्तीचा अधिकार विधानसभा अध्यक्षांचा आहे, असे म्हटले आहे. सध्या विधानसभेचे दुसरे सत्र सुरू आहे तरीही अजूनपर्यंत विरोधी पक्षनेत्याची निवड अध्यक्षांकडून करण्यात आलेली नाही. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्रिपद जसे घटनात्मक आहे, त्याचप्रमाणे ‘विरोधी पक्षनेता’ हे पददेखील घटनात्मक पद आहे. केवळ विधानसभा अध्यक्षांचा अधिकार असल्यामुळे त्यावर निर्णय न घेणे हीदेखील घटनेची पायमल्ली होत आहे, असेही निवेदनात म्हटले आहे. विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपद रिक्त आहे. त्या संदर्भात विरोधकांनी सरन्यायाधीशांना निवेदन दिले असले तरी सरन्यायाधीश या विषयात लक्ष घालण्याची शक्यता नाही आणि त्यांच्याकडून ते अपेक्षितही नाही. राज्यघटनेत संसद, कार्यपालिका आणि न्यायपालिका या तीन स्तंभांचे स्वतंत्र अधिकार मान्य करण्यात आले आहेत. न्यायपालिका संसदीय कार्यपध्दतीविषयी फार तर मत व्यक्त करेल ,पण अधिकारक्षेत्रात हस्तक्षेप करणार नाही याची जाणीव मविआलाही असेल. पण शिवसेनेचा आग्रह असल्यामुळे निवेदन दिले गेले असेल. खरे तर असे व्हायलाच नको होते. कारण संसदीय प्रथा-परंपरांची जपणूक हा एका पक्षाचा विषय नसतो तर सत्ताधारी पक्षाची जबाबदारी अधिक असते. कारण विरोधी पक्षाला लोकांनी जाणीवपूर्वक मते दिलेली असतात, त्याचाही आदर करावा लागतो, करायचा असतो. अर्थात अशी भावना असेल तर बरेच प्रश्न सुटू शकतात. पूर्वीच्या सत्ताधा-यांना हे भान होते. खरे पाहता आज विरोधी पक्षनेत्याचे महत्त्व किती राहिलेय हा चर्चेचा विषय आहे. विरोधी पक्षनेता सरकारच्या कामकाजावर लक्ष ठेवून असतो. सरकारच्या धोरणावर जाब विचारू शकतो. म्हणून लोकशाहीत विरोधी पक्षनेतेपद महत्त्वाचे असते. विधिमंडळात विरोधकांचा आवाज नसेल तर सरकार मनमानी कायदे करू शकते. म्हणून विरोधी पक्षनेतेपदाचा तिढा सुटणे आवश्यक आहे, अर्थात त्यासाठी सरकारनेही सकारात्मक राहिले पाहिजे.

## रूद्रापूर येथे शेतकऱ्याची आत्महत्या

शिरूर । प्रतिनिधी

**जिल्ह्यामध्ये सर्वाधिक शेतकरी आत्महत्येच्या घटना घडत आहेत. आज सकाळी पुन्हा एक आत्महत्या झाली. शिरूर तालुक्यातील रुद्रापूर येथील एका ५५ वर्षीय शेतकऱ्याने झाडाला गळफास घेऊन आपले जीवन संपविले. कर्जबाजारीपणामुळे शतेकऱ्याने आत्महत्या केली असल्याचे सांगण्यात आले.**

भीमराव भगवान कातखडे (वय ५५ वर्ष) या शेतकऱ्याने आज सकाळी लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केली असल्याचे सांगण्यात येते. घटनेची माहिती शिरूर पोलिसांना झाल्यानंतर पोलिसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आणला होता. दरम्यान मराठवाड्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्येच्या घटना बीड जिल्ह्यामध्ये होत आहेत. वर्षाला दोनशेपेक्षा जास्त शेतकरी आपलं जीवन संपवत आहेत.

## बीडमध्ये ‘रेंज पाहिजे’ नाटकाच्या तालमीचा भव्य शुभारंभ!

बीड । प्रतिनिधी

**अनेक वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडानंतर बीडच्या रंगभूमीवर नवचैतन्याचा श्वास घेणाऱ्या ‘रेंज पाहिजे’ या दोन अंकी नाटकाची निर्मिती करण्यात येत असून काल दि. ११ जुलै २०२५ रोजी सायंकाळच्या दरम्यान गुरुपौर्णिमेच्या मंगलमय दिनी नटाराजाच्या पावन साक्षीने या नाटकाच्या तालमीचा भव्य शुभारंभ पार पडला. जेष्ठ पत्रकार व दै. दिव्य लोकप्रभाचे संपादक सन्मानीय संतोषजी मानूरकर तसेच ट्विंकलिंग स्टार स्कूलचे संस्थाचालक मा. गणेश मैड यांच्या शुभहस्ते या नाट्यप्रयोगाच्या तालमीचा प्रारंभ आणि पोस्टर प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला.**




‘आम्ही कलावंत प्रस्तुत रेंज पाहिजे’ या नाटकाचे दिग्दर्शन लक्ष्मीकांत दोडके यांच्याकडे असून या नाटकाचे लेखन सौ. सोनलताई नहार यांनी केले आहे. सहाय्यक दिग्दर्शक म्हणून रोहित पुराणिक आपले योगदान देणार आहेत. दरम्यान उद्घाटक संतोष मानूरकर व गणेश मैड यांनी संपूर्ण नाट्यसंघाला मनःपूर्वक शुभेच्छा देत कलाकारांचे मनोबल उंचावले. या नाटकात बीडमधील तब्बल ७० कलाकार सहभागी होतायत हेच या नाटकाचे खरे सामर्थ्य ठरणार असून या नाट्यप्रयोगाच्या माध्यमातून बीडची रंगभूमी पुन्हा नवचैतन्याने फुलणार असल्याची भावना व्यक्त केली. याप्रसंगी रेंज पाहिजे या नाटकातील सहभागी कलाकार तसेच पालक उपस्थित होते. नवोदित कलाकारांना एकत्र आणून त्यांना व्यासपीठ देण्याच्या हेतूने या नाटकाची निर्मिती होत आहे व कालपासूनच या नाटकाची तालीम सुरु झाली आहे. येत्या ऑगस्ट महिन्यात ‘रेंज पाहिजे’ या नाटकाचा भव्य रंगमंचीय सादरीकरण प्रयोग रसिक प्रेक्षकांसमोर सादर होणार आहे, अशी माहिती या नाटकाचे निर्मिती सूत्रधार प्रतिक कांबळे यांनी दिली आहे.

## अमरनाथ चा जयघोष करीत २६ जणांचा जत्था अमरनाथ कडे रवाना

बीड । प्रतिनिधी



शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्री कंकालेश्वर मंदिर चे पुजारी श्री प्रभाकर गुरव महाराज यांच्या नेतृत्वाखाली बीड शहर व पर जिल्ह्यातील २६शिव भक्तांचा समूह १४जुलै २०२५ रोजी संभाजीनगर मार्गे श्री शेत्र अमरनाथ कडे रवाना होणार आहे हे या यात्रेचे २०वे वर्ष असून प्रभाकर महाराज गुरव या यात्रेचे नेतृत्व करीत आहे. या अमरनाथ यात्रेसाठी दरवर्षी भक्तांची संख्या सारखी वाढत असल्याचे आमच्या प्रतिनिधीशी बोलताना त्यांनी सांगितले आहे. यावर्षीची यात्रेचे खास बाब म्हणजे संभाजीनगर चे महापौर यांच्या नातूचाही या यात्रेत सहभाग आहे. दिनांक १४ जुलै रोजी बीड येथून संभाजीनगर व पुढे रेल्वेने प्रवास ते करणार आहे ही अमरनाथ यात्रा एकूण १४ दिवसाची असून त्यामध्ये अमृतसरचे सुवर्ण मंदिर, जम्मू दर्शन, कश्मीरचे शंकराचार्य मंदिर, वैष्णवी देवी मंदिर, शिवपुरी व अमरनाथ दर्शन घेऊन १८ जुलै रोजी परतीचा प्रवास करणार आहेत. या यात्रेत बीड जिल्ह्यासह जयसिंगपूर व इतरत्र जिल्ह्यातील शिवभक्तनी आपली नावे नोंदवली आहे.

## प्रियदर्शनीच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसाला मदत मिळाल्याचे समाधान-मा.आ.विलास खरात

जालना । प्रतिनिधी

**प्रियदर्शनी नागरी सहकारी बँकेची मुळामध्ये स्थापनाच ज्या उद्देशाने झाली त्याचा हेतू सफल होत असून बँकेच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसाला आर्थिक मदत देऊन त्याची पत बाजारात निर्माण करता आली याचे खरे समाधान असल्याचे प्रतिपादन बँकेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार अ‍ॅड.विलासबापू खरात यांनी आज येथे बोलतांना केले. अत्यंत अल्पावधीत सर्वच क्षेत्रात आपल्या कार्याचा जोरदार ठसा उमटवणाऱ्या प्रियदर्शनी नागरी सहकारी बँकेच्या ३१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अ‍ॅड. खरात बोलत होते.**

यावेळी व्यासपीठावर बँकेचे अध्यक्ष सीए.भुषण भक्कड, संचालक माजी आ. श्री.सुरेशकुमार जेथलिया, उपाध्यक्ष बळीराम जिगे, ओमशांती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री.विश्वजीत खरात, संचालक विशाल तौर आणि बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.सचिन वाणी यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. यावेळी आपल्या भाषणात अ‍ॅड.विलासबापू खरात पुढे म्हणाले, बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा आणि पुरस्कार वितरण असा दुहेरी योग आज आलेला असून अगदी अल्पावधीत बँकेने केलेली नेत्रदिपक प्रगती याच्या पाठीमागे योग्य सेनापतीची निवड असल्याचे सांगून अ‍ॅड.खरात यांनी बँकेचे अध्यक्ष श्री. भक्कड आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.सचिन वाणी यांच्या नेतृत्व कौशल्याचे कौतुक केले. बँकेमध्ये असणारा सर्व अधिकारी आणि कर्मचारी वर्ग अगदी जीवापाडा मेहनत करत असल्यामुळे सर्वच क्षेत्रात बँकेची चौफेर अशी प्रगती झाली असून गेल्या ३१ वर्षात प्रियदर्शनी बँकेने अनेक सर्वसामान्य लोकांना बाजारापेठेत स्थान निर्माण करून देण्याचे कौतुकास्पद कार्य केले असून या पाठीमागे सर्व संचालक तसेच बँकेचा संपूर्ण स्टाफ यांचे श्रेय असल्याचा उल्लेखही अ‍ॅड. खरात यांनी यावेळी केला. तत्पुर्वी माजी आ. तथा संचालक श्री.सुरेशकुमार जेथलिया आपल्या भाषणात म्हणाले, वित्तीय संस्था चालवतांना खूप मोठी कसरत करावी लागत असून अ‍ॅड. विलासबापू खरात यांनी प्रियदर्शनी बँकेला ज्या पध्दतीने वाढवले ही बाब अभिनंदनास्पद आहे. त्यांना सहकार क्षेत्राचा दांडगा अनुभव असल्यामुळे अगदी अल्प काळात प्रियदर्शनी बँकेने आपला नावलैकिक वाढवला असल्याचेही श्री.जेथलिया म्हणाले. बँकेचे अध्यक्ष श्री. भूषण भक्कड यांनी प्रास्ताविक करतांना बँक कर्मचाऱ्यांनी सामुहिक पध्दतीने परिश्रम करून बँकेला नावारूपाला आणल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन करून यापुढील काळातही बँकेने उत्कृष्ट सेवा द्यावी अशी अपेक्षा व्यक्त केली. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.सचिन वाणी यांनी अहवाल वाचतांना आजपासून प्रियदर्शनी बँकेत विदेशी चलन सेवा सुरू करत असल्याचे जाहीर केले. राज्य सहकारी बँक आणि प्रियदर्शनी बँकेच्या संयुक्त विद्यमाने ही सेवा देण्यात येणार असून मागील वर्षात बँकेने उपलब्ध करून दिलेल्या फ्रँकींग सेवेतून जिल्ह्यात सर्वाधिक उत्पन्न मिळवल्याची माहीती दिली. यावेळी बँकेने आपल्या नव्याने तयार करण्यात आलेल्या लोगोचे अनावरण मान्यवरांच्याहस्ते करण्यात आले. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सचिन वाणी यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल यावेळी मान्यवरांच्याहस्ते त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. त्यानंतर बँकेची प्रगती करणाऱ्या तसेच विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यामध्ये सर्वोत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार श्री.पोपट भिल्लारे यांना तर सेवानिष्ठ पुरस्कार श्री.सागर टोपले आणि श्री. अनिल फुलारे यांना देण्यात आला. नवकल्पना व सुधारणा पुरस्कार शाखाधिकारी श्री.विलास खंडागळे यांना तर उत्कृष्ट ग्राहक सेवा कार्य पुरस्कार मदन कांगडे, श्रीमती अश्विनी जाधव आणि संतोष आर्दड यांना देण्यात आला. नेतृत्व आणि प्रेरणा पुरस्कार राजूर शाखेचे शाखाधिकारी सचिन राठोड यांना देण्यात आला. सहकार्य व सांघिक भावना पुरस्कार शहागड शाखेचे शाखाधिकारी नितीन बोबडे आणि मुख्य शाखेच्या गीता काळे यांना देण्यात आला. सर्वात वेगवान प्रगती पुरस्कार श्री.योगेश शेरला, प्रतिक्षा तौर, कु. अंकिता चौधरी आणि पवन जाधव यांना देण्यात आला. अष्टपैलू कर्मचारी पुरस्कार रियाज बशीर शेख, तीर्थपूरी शाखेतील अमोल खरात आणि अमोल अटकळ यांना देण्यात आला. माहीती तंत्रज्ञान व सायबर प्रचार कार्य पुरस्कार श्री.सुनिल कंधारकर यांना देण्यात आला. उत्कृष्ट शाखेचा पुरस्कार रामनगर शाखेला मिळाला असून उत्कृष्ट वसुली अधिकारी पुजा ढेकेकर यांना देण्यात आला. उत्कृष्ट कर्जवाटप पुरस्कार अभिजीत पाटील तर स्मार्ट इन्व्हेस्टमेंट पुरस्कार तुषार बगडिया यांना देण्यात आला. नवकल्पना बँकीग गौरव पुरस्काराचे मानकरी वैभव खरात ठरले असून सर्वोत्कृष्ट रोखपाल पुरस्कार अजिंक्य उगले यांना देण्यात आला. वार्षिक सभेनंतर जम्मू कश्मीरमधील पुलवामा येथील हल्ल्यात शहीद झालेल्या तसेच अहमदाबाद येथील विमान दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री. नितीन बोबडे तर शेवटी उपस्थितांचे आभार अ‍ॅड. वाल्मिक घुगे यांनी मानले. या सभेला अ‍ॅड.रोशल गोलेच्छा, अर्जुनराव जाधव, दादा पाटील अटकळ, अंबादास चौधरी यांच्यासह सर्व संचालक आणि सभासदांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## अंमली पदार्था जप्त करून १६२ जणांवर गुन्हे



जालना । प्रतिनिधी

पोलीस अधिक्षक यांचे आदेशाने विशेष मोहिम राबवुन तंबाखु, तंबाखुजन्य पदार्थ, ई सिगारेट अंमली पदार्थावर कारवाई करण्यात आली सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने (जाहिरात प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादने, पुरवठा व वितरण याचे विनीमय) (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१८ चे प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस अधिक्षक अजय कुमार बंसल यांनी दिनांक १०/०७/२०२५ व दिनांक ११/०७/२०२५ रोजी जालना जिल्हयातील घटकात शाळा व महाविदयालयच्या परिसरात तंबाखु, तंबाखुजन्य पदार्थ, ई-सिगारेट व इतर अंमली पदार्थावर कार्यवाही करणे कामी आदेशित केल्याने जालना जिल्हा सर्व पोलीस ठाणे अंतर्गत पोलीस ठाणे आष्टी अंतर्गत ९ पोलीस ठाणे टेंभुर्णी १५, पोलीस ठाणे परतुर ४, पोलीस ठाणे तालुका जालना १४, पोलीस ठाणे भोकरदन ०७, पोलीस ठाणे चंदनझिरा १२, पोलीस ठाणे तिर्थपुरी ०६, पोलीस ठाणे मौजपुरी १०, पोलीस ठाणे कदिम जालना ०८, पोलीस ठाणे सदर बाजार ०९, पोलीस ठाणे हसनाबाद १८, पोलीस ठाणे सेवली ०३, पोलीस ठाणे मंठा १०, पोलीस ठाणे बदनापुर ०६, पोलीस ठाणे अंबड १२, पोलीस ठाणे जाफ्राबाद ०७, पोलीस ठाणे पारध ०८, पोलीस ठाणे घनसावंगी ०४ अश्या एकुण १६२ केसेस करण्यात आले असुन ३२,४०० रुपयाचा दंड वसुल करण्यात आला आहे. सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी यांचे मार्गदर्शनाखाली सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

## पान १ वरून...

### मराठवाड्यात कापसाचा

दुसरीकडे लागवडीचा खर्च निघेना, अपेक्षित उत्पन्न नसल्याने शेतकरी दुसऱ्या पिकाकडे वळल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. तर दुसरीकडे मक्याला चांगला भाव मिळत असल्याने सोयाबीन आणि मका लागवडीकडे यंदा शेतकऱ्यांचा मोठा कल असून त्यामुळेच कापसाची पेरणी टाळत सोयाबीन आणि मक्याच्या लागवडीमध्ये मोठी वाढ झाली आहे.

------------

### तीन ‘संजय’ मुळे दोन्ही सेनेची

शब्दाचे वार झेलावे लागले त्यानंतर दुसऱ्या शिवसेनेतील संजय गायकवाड आणि संजय सिरसाट यांच्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे अडचणीत सापडले आहेत एकनाथ शिंदे यांनी गायकवाड आणि शिरसाट यांचे कडक शब्दांत कान टोचल्याची माहिती एका मराठी वृत्तवाहिनीने दिली आहे. ‘मंत्री आणि आमदार यांचे बेशिस्त वक्तव्य आणि वागणुकीमुळे पक्षाची प्रतिमा डागाळत आहे. त्यामुळे असा बेशिस्तपणा खपवून घेणार नाही,’ अशी सक्त ताकीदच एकनाथ शिंदे यांनी गायकवाड आणि शिरसाट यांना दिल्याचे सांगितले जात आहे. पन संजय राऊत याना ताकीद कोण देणार पक्ष प्रमुखांनी दिली पाहिजे पन तेच मुख्य प्रवक्ते आहेत एकंदरीत तीन संजय मुळे दोन शिवसेनेची अधिवेशनात कोंडी होते हे तेवढेच सत्य .

--------------

### रेल्वेत नोकरी देतो म्हणून परळीतील

मागून घेतली. या शिवाय, महादेवच्या मामाकडून आणि आजोबांकडून त्याच्या चुलत मामासाठी ‘‘टीसी‘‘ पदावर नोकरी लावण्यासाठी तब्बल १४,७०,००० रुपये उकळण्यात आले. यातून काही रक्कम स्वतः महादेवच्या खात्यातून व वडिलांच्या खात्यातून प्रेमकुमार यांच्या खात्यावर पाठवली. अशी तब्बल २४ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. महादेवचे चुलत मामा दिल्लीतून मिळालेली नियुक्तीपत्र घेऊन मुंबई येथे ऑफिसमध्ये जॉईन होण्यासाठी गेले. मात्र, तेथील अधिकाऱ्यांनी ही ऑर्डर बनावट असल्याचे स्पष्ट केल्यानंतर सर्व प्रकाराची पोलखोल झाली. ज्यानंतर संपूर्ण कुटुंबाला मोठा धक्काच बसला. या सर्व प्रकारानंतर महादेव मुंडे यांनी संभाजीनगर, परळी वै. पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली असून काशीनाथ घुगे, सचिन वंजारे, संजय ठाकूर (रा.दिल्ली), सुरजकुमार सिंग (अमृतसर, पंजाब), या संबंधितांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ कलम३ (५), भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ कलम ३४२(२),भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ कलम३४०(२),भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ कलम ३३६ (३), भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ कलम ३३६(२),भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ कलम ३१६(२), भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ कलम ३१८(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अनिल शिंदे हे करीत असल्याचे सांगण्यात येत आहे.

-----------

### सात जिल्ह्यातून धावणार

आंतर वंदे भारत एक्स्प्रेस ९ तासांत पूर्म करणार आहे.२६ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबई ते हजूर साहिबा नांदेड वंदे भारत एक्स्प्रेसच्या उद्घाटनाच्या दिवशी एक विशेष गाडी सोडण्यात येणार आहे.. त्यानंतर २७ ऑगस्टपासून सीएसएमटी ते हजूर साहिब नांदेड आणि २८ ऑगस्टपासून हजूर साहिब नांदेड ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई अशी धावणार आहे.

-----------

### मुरलीधर मोहोळ अनपेक्षितपणे

मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीतील एका कार्यक्रमात ते बोलत होते. पुण्याचे खासदार आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या प्रथमवर्ष कार्यअहवालाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात भाजपाचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी चंद्रकांत पाटील म्हणाले, पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांना अनेपक्षितरित्या केंद्रात राज्यमंत्रिपद मिळाले आहे. मोहोळ यांना थेट केंद्रात राज्यमंत्रिपदाची जबाबदारी मिळेल याचा अंदाज तेव्हा कोणालाही आला नव्हता. दरम्यान, आता भाजपाचे नेते चंद्रकांत पाटील यांनी मोहळ यांना मिळालेल्या याच जबाबदारीवर भाष्य केले. मुरलीधर आता मुरलीधर अण्णा झाले आहेत. आता मलाही अमित शाहा यांना भेटण्यासाठी मुरलीधर मोहोळ यांच्याशी बोलावं लागते. अण्णा अनपेक्षितरित्या केंद्रात मंत्री झाले, असे चंद्रकांत पाटील म्हणाले. अमितभाईंना भेटण्यासाठी पुर्वी लोक माझ्याकडे पाहायचे. मात्र आता मलाही अमितभाईंना भेटण्यासाठी अण्णाला बोलावे लागते, असे चंद्रकांत पाटील म्हणाले. तसेच मुरलीधर आता मुरलीधर अण्णा झाले आहेत. अण्णासाहेब होतील तेंव्हा त्यांना साहेब म्हणू, अशी टिप्पणीही त्यांनी केली आहे.

----------

### लालपरीला आषाढीत पांडुरंग पावला

आषाढी यात्रेनिमित्त एसटी महामंडळाकडून ५२०० जादा बसेस पंढरपूरसाठी पाठवण्यात आल्या होत्या. त्या माध्यमातून एसटीने तब्बल ९ लाख ७१ हजार ६८३ भाविक-प्रवाशांची सुरक्षित ने-आण करून त्यांना विठ्ठल दर्शन घडविले. या सेवेतून एसटीला ३५ कोटी ८७ लाख ६१ हजार रुपये उत्पन्न मिळाले, अशी माहिती परिवहन मंत्री, एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.मंत्री सरनाईक म्हणाले की, आषाढी यात्रेनिमित्त अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या विठुरायाच्या दर्शनासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून पंढरपूर येथे मोठ्या संख्येने भाविक-प्रवासी येत असतात. या भाविक-प्रवाशांना त्यांच्या गावापासून पंढरपूरपर्यंत ने-आण करण्यासाठी एसटीने तब्बल ५ हजार २०० जादा बसेस सोडल्या होत्या.३ ते १० जुलै दरम्यान या बसेसनी २१ हजार ४९९ फे-या करून तब्बल ९ लाख ७१ हजार ६८३ भाविक-प्रवाशांची सुरक्षित ने-आण केली आहे. यातून एसटी महामंडळाला ३५ कोटी ८७ लाख ६१ हजार रुपये इतके उत्पन्न मिळाले आहे. जे मागील वर्षी मिळालेल्या उत्पन्नापेक्षा ६ कोटी ९६ लाख ३ हजार रुपयांनी जास्त आहे. २०२४ साली आषाढी यात्रेचे एकूण उत्पन्न २८ कोटी ९१ लाख ५८ हजार रुपये इतके होते.

---------

### जयंत पाटील प्रदेशाध्यक्षपदावरुन

असून १५ जुलै रोजी शशिकांत शिंदे पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदाचा पदभार स्वीकारणार आहेत.

------------

### स्व.मुंडेंची तिसरी कन्या

‘प्रॉमिसिंग आशियाई स्टुडंट’ म्हणून गौरवण्यात आले होते. त्यांचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून झाले आहे. यापूर्वी त्या राजकारणापासून दूर राहिल्या होत्या. मात्र, आता वैद्यनाथ बँकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने त्या राजकीय मैदानात उतरल्या आहेत.

--------------

cmyk

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि. १३ जुलै २०२५



## अंबाजोगाई तालुक्यात सरपंच पदासाठी आरक्षण सोडत १५ जुलै रोजी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**अंबाजोगाई तालुक्यातील सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सरपंच पदांसाठी आरक्षण निश्चित करण्यासाठी सोडत पद्धतीने आरक्षण प्रक्रिया येत्या १५ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता अंबाजोगाई तहसील कार्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.**

या प्रक्रियेत अंबाजोगाई तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांवरील अनुसूचित जाती, जमाती, भटक्या-विमुक्त जाती, इतर मागासवर्गीय तसेच महिला आरक्षण निश्चित केले जाणार आहे. सदर आरक्षण सोडत प्रक्रिया सार्वजनिकरित्या व पारदर्शक पद्धतीने करण्यात येणार असून, इच्छुक ग्रामस्थांनी व स्थानिक प्रतिनिधींनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन अंबाजोगाईचे तहसीलदार विलास तरंगे यांनी केले आहे. ही आरक्षण प्रक्रिया महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार व निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार राबविण्यात येणार आहे. त्यामुळे आगामी ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये कोणत्या गटातून कोणत्या सामाजिक प्रवर्गासाठी सरपंच पद आरक्षित राहील, याचे स्पष्ट चित्र यावेळी समोर येणार आहे.तालुक्यातील ग्रामस्थ, राजकीय पदाधिकारी, इच्छुक उमेदवार आणि स्थानिक प्रतिनिधींनी तहसील कार्यालय, अंबाजोगाई येथे १५ जुलै रोजी सकाळी ११ वाजता उपस्थित राहून सदर प्रक्रियेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# अखेर 'त्या' दुर्दैवी बाळाने रुग्णालयातच घेतला जगाचा निरोप

### जिवंत असतांना मृत घोषित केलेल्या त्या दुर्दैवी बाळाने जन्माच्या चौथ्या दिवशीच घेतला अखेरचा श्वास, त्या बाळाच्या मृत्यूस जबाबदार कोण?

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाईच्या स्वा रा ती रुग्णालयातील चार दिवसापूर्वी जन्मलेले ते बाळ सध्या संपूर्ण महाराष्ट्रात चर्चेचा विषय ठरले आहे.कारण ८ जुलै रोजी जन्मलेले बाळ अवघ्या काही तासातच डॉक्टरांनी मृत घोषित करून ते कपड्यात बांधून नातेवाईकांच्या ताब्यात दिले होते. नातेवाईकानी देखील त्या बाळाचा अंत्यविधी आपल्या होळ या गावी करण्याच्यासाठी घेऊन गेले . अंत्यसंस्कारासाठी खड्डा खणत असतांना बाळाच्या आज्जीची त्याचे तोंड पाहण्याची इच्छा झाल्याने कपड्यात बांधलेले ते बाळ खोलून पाहिले असता त्याचा रडण्याचा आवाज ऐकू आला. तात्काळ बाळाच्या आजोबांनी बाळास परत अंबाजोगाई येथील स्वाराती येथे दाखल केले. डॉक्टरांनी त्या बाळास अतिदक्षता विभागात दाखल केले.उपचारादरम्यान आज त्या दुर्दैवी बाळाने अखेर जगाचा निरोप



घेतला. या दुर्दैवी तथा दुःखद घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. मात्र या बाळाच्या मृत्यूस जबाबदार कोण हा मोठा व निरुत्तरीत प्रश्न निर्माण झाला आहे. त्या बाळास व त्याच्या पालकास न्याय मिळेल का असा प्रश्न देखील नागरिकांतून विचारला जात आहे. होळ येथील बालिका घुगे या महिलेच्या बाळाचा जन्म अवघ्या सातव्या महिन्यात झालेला असल्यामुळे अधिकच अशक्त असलेल्या बाळाने या अतिदक्षता विभागातील उपचारांना प्रतिसाद न देता अखेर काल ११ जुलै रात्री अखेरचा श्वास घेत या जगाचा निरोप घेतला. या बाळाच्या जन्माने व निधनाने स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रसुती शास्त्र विभाग व बाल रोग विभागावर प्रश्न चिन्ह निर्माण करून ठेवले आहे. जिवंत असलेल्या बाळास मृत घोषित करणा-या डॉक्टरांचा तपास लागण्यापूर्वीच या बाळाने अखेरचा श्वास घेतला असल्यामुळे आता नेमका या बाळाचा मृत्यू कशामुळे झाला आहे हा ही प्रश्न निर्माण केला आहे?

### चौकशी समितीच्या अहवाल केंव्हा येणार?

**अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या स्त्री रोग व प्रसुती शास्त्र विभागाच्या बाल रोग विभागाच्या अंतररुग्ण कक्ष विभागात घडलेल्या या लांच्छनास्पद घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला आहे. जिवंत असलेल्या बालकास मृत घोषित करणा-या डॉक्टरांच्या हलगर्जीपणाची चौकशी करण्यासाठी तत्कालीन अधिष्ठाता डॉ. राजेश कचरे यांनी तातडीने पाच सदस्यीय समिती नियुक्त करून स्त्री रोग विभागाचे प्रमुख यांचे कडून या संपूर्ण घटनेचा मागितलेला लेखी अहवाल अजून तरी आला नसून येणार तो अहवाल नेमका कोणाच्या बाजूने येणार का डॉक्टर बांधवाना पाठीशी घालणार याकडेही सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.**



## सरवर पिंपळगाव जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

माजलगाव । प्रतिनिधी

तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., माजलगाव शाखेच्या वतीने सामाजिक उत्तरदायित्वातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सरवर पिंपळगाव (मराठी व उर्दू माध्यम) येथील विद्यार्थ्यांना शनिवारी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.ह्या वेळी विद्यार्थ्यांना आवश्यक असे शालेय दप्तर,पेन्सिल, चार ओळी वही,दोन ओळी वही,बॉक्स नोटबुक,शॉपनर, खोडरबर तसेच बालमित्र उजळणी पुस्तक,अशी अनेक साहित्य विद्यार्थ्यांना आज गावातील प्रतिष्ठित नागरिक यांच्या शुभहस्ते वाटप करण्यात आले यावेळी बँकेचे कर्मचारी, स्थानिक लोकप्रतिनिधी,ज्येष्ठ नागरिक,गावातील पदाधिकारी, मुख्याध्यापक शिक्षकवृंद पालक, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी विद्यार्थी यांची उपस्थिती होती. यावेळी शाळेच्या प्रतिनिधीच्या वतीने,बँकेचे प्रतिनिधी, स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे छोटेखानी सत्कार करण्यात आले.

## ओमशांती साधना धाम आत्महत्या प्रकरणातील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता

### संस्थेच्या बदनामीचा प्रयत्न असल्याचा ॲड. अजित लोमटे यांचा युक्तिवाद ठरला प्रभावी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**अंबाजोगाईतील गाजलेल्या ओमशांती साधना धाम आत्महत्या प्रकरणातील पाचही आरोपींना अंबाजोगाई जिल्हा व सत्र न्यायालय क्र. २ यांनी सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्त केले आहे. सत्र खटला क्रमांक २१/२०२१ मध्ये सरकार विरुद्ध सुनीता किसनराव कुलकर्णी व इतर या प्रकरणात सुनावणी पार पडली. दिनांक ११ जुलै २०२५ रोजी मा. न्यायाधीश रश्मी तेहरा यांनी निकाल देताना, पुरावे असमर्थ ठरल्याने आरोपींना दोषमुक्त करण्याचे आदेश दिले.**

सदर प्रकरण २०१९ साली अंबाजोगाई पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले होते. कोळपिंप्री (ता. धारूर) येथील अविनाश आत्माराम आलाट यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांची बहिण पूजा आत्माराम आलाट ही ओमशांती साधना धाममध्ये धार्मिक सेवेसाठी गेली होती. ती 'शिवबाबा'ची भक्त




होती आणि विवाह न करण्याचा निर्णय तिने आधीच घेतला होता. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, ओमशांती सेंटरमध्ये राहात असताना पुजाला आरोपी सुनीता कुलकर्णी, प्रियदर्शनी पांचाळ, मंजुषा पांचाळ, महानंदा रामपूर व पुरुषोत्तम मांगुळकर हे मानसिक व भावनिक त्रास देत असल्याचे तिने अनेकदा कुटुंबियांना सांगितले होते. पुजा याच त्रासाला कंटाळून एका प्रसंगी केंद्रातून गावात परत आली होती. मात्र, पुन्हा संपर्क करून तिला परत नेण्यात आले. दि. १५ ऑक्टोबर २०१९ रोजी पुजाने स्वतःला पेटवून घेतल्याची माहिती भावाला फोनवरून देण्यात आली. गंभीर अवस्थेत तिच्यावर उपचार सुरू असताना ती दि. १६ ऑक्टोबर २०१९ रोजी पहाटे मृत्यू पावली. उपचारादरम्यान तिने दिलेल्या कथित जबाबात आपल्याला त्रास दिला जात असल्याचे नमूद होते. यानंतर आरोपींविरुद्ध भादंवि कलम ३०६, ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. या खटल्यात फिर्यादी पक्षाने एकूण सात साक्षीदार तपासले. मात्र, न्यायालयात दोष सिद्ध होऊ न शकल्याने व संस्थेला बदनाम करण्याच्या हेतूने खोट्या आरोपाखाली गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचा बचाव पक्षाचा प्रभावी युक्तिवाद लक्षात घेता सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. आरोपींच्या वतीने प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. अजित लोमटे यांनी प्रभावी काम पाहिले.

पान ६ वरून...

### मुकुंदराज कड्यावरून युवतीचा

रुग्णालयात हलवले. विशेष बाब म्हणजे, दोन वर्षांपूर्वी राधा लोमटे हिच्या सख्ख्या भावाने देखील याच मुकुंदराज कड्यावरून उडी घेऊन आत्महत्या केली होती. त्या घटनेचा मानसिक परिणाम राधाच्या मनावर झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे.या संपूर्ण घटनेबाबत पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी सांगितले की, ''राधाला शंभर टक्के जीवदान मिळेल, असा आम्हाला विश्वास आहे. आमच्या पथकाने वेळेवर दाखवलेली तत्परता हीच तिच्या जीविताचे कारण ठरली.''घटनेनंतर शहरात पोलीस पथकाच्या धाडसी कार्याची सर्वत्र स्तुती होत असून, सोशल मीडियावरही या कर्मचाऱ्यांचे कौतुक होत आहे.

### सालगड्याला वाचवण्यासाठी

यांना शिवीगाळ करून मारहाण करण्यास सुरुवात केली.

दरम्यान लाठ्या-काठ्या, कुऱ्हाड आणि गुप्ती अशी धारदार शस्त्रे घेऊन झाडीमध्ये लपून बसलेल्या दहा-बारा जणांनी बाहेर येत शेतगडी आणि शेतमालक राजाराम सिरसट यांना मारहाण करायला सुरुवात केली. या गंभीर जखमी अवस्थेत राजाराम सिरसट यांना जबरदस्ती मोटरसायकलवर बसवून यावेळी सदरील मुकादम आणि त्याच्या साथीदारांनी राजाराम सिरसट यांच्या जवळील दीड लाख रुपये हिसकावून घेत बेदम मारहाण केली. सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांनी मारहाण करणाऱ्या मुकादम आणि त्याच्या साथीदाराच्या विरोधात तक्रार दिली असून आज शनिवार दिनांक १२ रोजी सायंकाळी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

### फुले पिंपळगावच्या दलितांची

करण्याची तजवीज ठेवल्याचा अहवाल आयोगाकडे सादर केला होता पण यात हि पोलीसांनी शेख मंजूर व इतरांशी संगनमत करुन गुन्हे दाखल करण्यास टाळाटाळ करत प्रकरण दडपुन टाकले होते. हि बाब मनोज साळवे यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर दि ३० जून २०२५ रोजी फाईल संख्या एपीसीआर /आरपी/एमएच/२०२५/ ३००६२५ दिनांक ३०/०६/२०२५ च्या आयोगाने जिल्हा पोलीस अधीक्षक यांना नोटीस जारी करून भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३३८ च्या अंतर्गत मिळालेल्या अधिकारात प्रकरणी चौकशी करण्याचा निर्णय घेतला आहे.म्हणुन जिल्हा पोलीस अधीक्षक यांना नोटीस मिळाल्यानंतर ३० दिवसात नोटीस मध्ये दिलेल्या विहित नमुन्या प्रमाणे चौकशी करून अहवाल आयोगाकडे सादर करावा असे म्हटले आहे. सदर नोटीस मध्ये शेवटी नमुद केले आहे की,कृपया लक्षात घ्यावे की, आयोगाने दिलेल्या निर्धारीत कालावधीत काहिच उत्तर दिले नाही तर भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३३८ नुसार आयोगाला मिळालेल्या अधिकारा प्रमाणे दिवाणी न्यायालया प्रमाणे पोलीस अधीक्षक यांनी अथवा त्यांच्या प्रतिनिधी यांना आयोगाच्या समोर हजर राहण्याचे समन्स बजावु शकते.

### आमदार सुरेश धस यांनी

वाजेच्या सुमारास हा अपघात झाला.नितीन प्रकाश शेळके (३४,रा.पळवे खुर्द, ता.पारनेर)असे मृत दुचाकीस्वाराचे नाव होते.अपघात झाल्यानंतर आमदार सुरेश धस यांचे पुत्र स्वतः सागर धस हे जखमीला दवाखान्यात घेऊन गेले व उपचार करण्यास सांगितले परंतु दुर्दैवाने नितीन यांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला.या दुर्दैवी घटनेचा सोशल मिडीयावर विरोधकांनी ट्रोल करत आरोपांची लाखोळी केली.यानंतर स्वतः आमदार सुरेश धस यांनी मिडीयासमोर येऊन या अपघाताची संपुर्ण चौकशी करा,माझ्या मुलांच्या रक्ताचे नमुनेही तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवा यात मी कसलाही सहभाग घेणार नाही हे जाहीर करत पोलिसांनी योग्य तो तपास करावा अशी सुचनाही धस यांनी दिली. त्यानंतर अधिवेशन आटोपून ते आष्टीकडे येत असताना मयत नितीन शेळके यांच्या घरी जाऊन भेट झालेल्या दुर्दैव घटनेबद्दल खंत व्यक्त करत कुटुंबियांना धिर दिला.

### पवार- मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त

जाणीव निर्माण व्हावी, तसेच गरजू रुग्णांना तातडीने रक्त उपलब्ध व्हावे या उद्देशाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करून या सप्ताहाचा शुभारंभ होणार आहे . या रक्तदान शिबिरात अनेक तरुण स्वयंसेवक सहभाग नोंदवणार आहेत. बुधवार दि १६ रोजी पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या उद्देशाने वृक्षारोपण मोहीम राबवली जाणार असून यात सार्वजनिक जागांमध्ये व शासकीय परिसरात विविध प्रकारची झाडे लावण्यात येणार आहेत. गुरुवार दि १७ रोजी अंबाजोगाई बसस्थानक परिसरात स्वच्छता मोहीम राबवली जाणार आहे. शहराच्या स्वच्छता व सौंदर्यात भर घालणाऱ्या या उपक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन मोदी व चव्हाण यांनी केले आहे. शुक्रवार दि १८ जुलै रोजी गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे. यासाठी शहरातील शाळा व संस्थांशी समन्वय साधून तेथील विद्यार्थ्यांना सदर शैक्षणिक मदत पोहोचवली जाणार आहे. शनिवार दि १९ जुलै रोजी प्लास्टिकमुक्त अंबाजोगाईसाठी जनजागृती मोहिम राबवण्यात येणार आहे. याद्वारे पर्यावरण पूरक जीवनशैलीचा अंगीकार करण्याचे संदेश या माध्यमातून समस्त नागरिकांस दिले जाणार आहे. दि २० रोजी श्री योगेश्वरी मंदिर परिसरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांना मोफत महाप्रसादद्वारे अन्नदान करण्यात येणार आहे. सोमवार दि २२ जुलै रोजी ''तुमचं मत, माझं कर्तव्य'' ही नाविन्यपूर्ण अशी संकल्पना राबविण्यात येणार आहे. या संकल्पनेतून नागरिकांच्या गरजा, त्यांच्या तक्रारी व नागरिकांच्या प्रलंबित मागण्या समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी एक विशेष जनसंपर्क उपक्रम राबवला जाणार आहे. प्रत्येक वयोगटातील नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेण्याचा आणि त्या मार्गी लावण्याचा प्रयत्न या उपक्रमाद्वारे केला जाणार आहे.

## गुरुपौर्णिमेनिमित्त राजमुद्रा करिअर अकॅडमीत प्रेरणादायी कार्यक्रम

म्हसोबावाडी। प्रतिनिधी

जय जिजाबाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी शिक्षण संस्था संचलित राजमुद्रा करिअर अकॅडमी, अहिल्यानगर येथे गुरुपौर्णिमेनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात मान्यवर अतिथींच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शान वाढली. अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे आणि नुकतेच महाराष्ट्र शासनाचा वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार प्राप्त झालेले आष्टी तालुक्यातील सोलापूरवाडी गावचे भूषण हनुमंत गावडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना मौल्यवान मार्गदर्शन दिले.

या कार्यक्रमात गावडे यांनी विद्यार्थ्यांना शेतीचे सामाजिक, आर्थिक व वैज्ञानिक महत्त्व समजावले. त्यांनी आधुनिक शेतीच्या संधी, जैविक शेतीचे फायदे आणि शेतकरी या देशाच्या कणा आहे हे अधोरेखित करत शेतीक्षेत्रात युवकांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन केले. यासोबतच, आजच्या डिजिटल युगात वाढणाऱ्या सायबर क्राईमविषयीही त्यांनी सजगतेचा इशारा दिला, आणि विद्यार्थ्यांनी सोशल मिडियाचा वापर काळजीपूर्वक करावा, तसेच सायबर सुरक्षेबाबत जागरूक राहावे, असे मार्गदर्शन केले.

खुरागे यांनी विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रातील संधी, शारीरिक तंदुरुस्तीचे महत्त्व आणि



**जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, कृषिभूषण पुरस्कार प्राप्त शेतकरी हनुमंत गावडे यांनी केला विद्यार्थ्यांशी संवाद**

केंद्र व राज्य शासनाच्या विविध क्रीडा योजना याबद्दल माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना शारीरिक कसरती, नियमित सराव आणि स्पर्धात्मक दृष्टिकोन जोपासण्याचा सल्ला दिला.कार्यक्रमाचे आयोजन राजमुद्रा करिअर अकॅडमीच्या संस्थापिका व संचालिका प्रा. नंदाताई पांडुळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. उपस्थित विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला आणि या प्रेरणादायी मार्गदर्शनातून नवीन दृष्टिकोन प्राप्त केला.

विद्यार्थ्यांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा देण्यासाठी आणि त्यांच्या आयुष्यात प्रेरणा निर्माण व्हावी यासाठी या दोन्ही मान्यवरांनी विशेष वेळ काढून राजमुद्रा अकॅडमीला भेट दिली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मार्गदर्शन केले. जीवनामध्ये शेतीला महत्त्व द्या शेवटचा पर्याय जीवनामध्ये शेती हाच आहे. हे विशेष महत्त्व हनुमंत गावडे यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले. जीवनात शिस्त, सातत्य आणि मूल्यांची आवश्यकता पटवून दिली.राजमुद्रा करिअर अकॅडमीच्या संस्थापिका व संचालिका प्रा. नंदाताई पांडुळे यांनी या मान्यवरांचे मनःपूर्वक स्वागत केले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनातून नवीन ऊर्जा आणि प्रेरणा घेतली.हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या मनात गुरूविषयीचा आदर, कृतज्ञता आणि आत्मविश्वास जागवणारा ठरला, यावेळी राजमुद्रा करिअर अकॅडमीतील शिक्षक वृंद व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

पान ६ वरून...

### शिवछत्रपतींच्या स्वराज्याचा

केवळ महाराष्ट्रासाठी नव्हे, तर संपूर्ण देशासाठी अभिमानाची बाब आहे,व आपल्या सर्वांसाठी मराठी अस्मितेचा हा ऐतिहासिक क्षण असल्यामुळे दि १२ जुलै शनिवार रोजी माजलगाव शहरात भाजपाच्या वतीने एकत्र येऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी दुपारी ३:०० वाजता छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून , फटाक्यांची आतिषबाजी करत,छत्रपती शिवाजी महाराज की जय ,जय भवानी जय शिवाजी अशा घोषणा देत जल्लोष केला यावेळी भारतीय जनता पार्टीचे अरुण राऊत,डॉक्टर प्रशांत पाटील, डॉक्टर अशोकराव तिडके,विनायक रत्नपारखी,रूपाली कचरे,डॉक्टर अभिजीत सोळंके, ईश्वर खुरपे, अविनाश कांडूरे , शरद कचरे,कैलास खुरपे,बाळासाहेब क्षीरसागर ,प्रल्हाद दळवी,राम शिंदे,सिद्धेश्वर राठोड,रामेश्वर चव्हाण,सुशांत जाधवर ,बाळासाहेब साळवे,गोपाळ कुलकर्णी सर्व भाजपा नेते, पदाधिकारी,शक्ती प्रमुख,बुथ प्रमुख उपस्थित होते.

### पालखी मार्गच्या अपुर्ण कामाबाबत

करण्याचे आदेश माननीय उच्च न्यायालयाने दिले होते, सदरील काम मुदतीच्या आत पुर्ण न केल्यामुळे याचिकाकर्ते यांनी ॲड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांच्या मार्फत अवमान याचीका क्र.५०३/२०२५ दाखल केली. सदरील याचिकेची सुनावणी दि.०९.०६.२०२५ रोजी माननीय न्यायमूर्ती नितीन बी. सूर्यवंशी व माननीय न्यायमूर्ती संदीपकुमार सी. मोरे यांच्यापुढे झाली असता माननीय उच्च न्यायालयाने वरील प्रकरणात १. कार्यकारी अभियंता एस, एल, गलांडे राष्ट्रीय महामार्ग विभाग छत्रपती संभाजीनगर २. मुख्य अभियंता राजीव सिंग राष्ट्रीय महामार्ग सा.बां. विभाग मुंबई यांना सदरील अवमान याचीकेत नोटीसा काढल्या व याचिकेची पुढील सुनावणी दि.०६.०८.२०२५ रोजी ठेवण्यात आली असुन याचीकाकर्त्याच्या वतीने ॲड. नरसिंह जाधव यांनी काम पाहिले त्यांना सहकार्य ॲड. रविंद्र वानखेडे, ॲड.गौरव शिवाजीराव खांडे यांनी केलेव तर शासनाच्या वतीने ॲड. एस. आर. वाकळे यांनी काम पहिले.

### सामाजिक वनीकरण विभागाच्या

नागरिकांना पर्यावरण संरक्षणाचे महत्व वपर्यावरण संरक्षण आणि वृक्ष लागवडीचे महत्व पटवुन दिले व सार्वचे आभार मानले. सदरील कार्यक्रमास प्रमुख अतिथी कोल्हेरवाडी येथील सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य व इतर प्रतीष्ठीत नागरीक तसचं सामाजिक वनीकरण बीड विभागाचे श्रीमती एस.एम. ससाणे वनपाल, एस.पी. धसे वनपाल, आर.पी. यादर वनरक्षक जे. एल. कदम वनपाल, डी.एस.मोरे वनमजुर, श्रीमती शेख सायरा वनमजुर, श्रीमती करिमा खुददुस वनमजुर व रतजलाल गुजर व शिवचंद बागलाने व वृक्षप्रेमी हे उपस्थीत होते.


### शिक्षकांच्या प्रेरणेतूनच

यासाठी त्यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांचे अभिनंदन केले. आपण ज्या कुलाचाराचे नाते सांगतो त्या व्यक्तीच्या सदगुणांचा हा सन्मान असतो. संपूर्ण महाविद्यालयाच्या प्रगतीचा सतत विचार करणारा शिक्षक कार्यकर्ता यापुढे या पुरस्कारासाठी पात्र व्हावा म्हणून सर्व शिक्षक कार्यकर्ते नक्कीच प्रयत्न करतील अशा आशावाद ही त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला. गुणवंतनाव प्रोत्साहन देणारी आपली भारतीय शिक्षण प्रसारक संस्था आहे या संस्थेचा सध्या अमृत काळ सुरू आहे. ही संस्था समाजातील वेगवेगळ्या घटकांमध्ये काम करते. डॉक्टर, साहित्यिक, वक्ता, इंजिनियर असे सर्व समाजास पुरवते. सामाजिक स्वास्थ्य सुदृढ करण्यासाठी संस्था गेली ७५ वर्षे ही संस्था मेहनत करत आहे. नवीन शैक्षणिक धोरण जे भारताचे माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केले आहे त्याचा समाजामध्ये प्रचार प्रसार व्हावा म्हणून ही संस्था अग्रक्रमाने प्रयत्न करते. त्याच दृष्टीने इतिहास विषयाची राष्ट्रीय परिषद व नवीन शैक्षणिक धोरणावर आधारित विज्ञान विषयाची कार्यशाळा या ठिकाणी संपन्न होणार आहे. त्यांना देखील त्यांनी शुभेच्छा दिल्या. गेले वर्ष संस्थेने अहिल्याबाई होळकर यांचे त्रिजन्मशताब्दी वर्ष साजरे करून समाजामध्ये एक आदर्श निर्माण करण्याचे काम केले व खऱ्या अर्थाने अहिल्याबाई होळकर यांचे विचार बाराव्या शतकानंतर बसवेश्वरांच्या नंतर खऱ्या अर्थाने जर हिंदू धर्माची कोणी संरक्षक असेल तर ती महिला म्हणजे अहिल्याबाई होळकर होय. अशा या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान संस्थेने देखील त्यांची त्रिजन्मशताब्दी साजरी करून केला. अशा विविध कार्यक्रमामधून संस्था नेहमी समाजाला व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे काम करते असे ते म्हणाले.

## दुपारची झोप ठरु शकते हानिकारक -डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

**अनेकांना दुपारी जेवणावर आडवा हात मारून लगेचच आडवे होण्याची सवय असते. अशी दिवसा झोप घेणे तुमचे आरोग्य बिघडवू शकते, असे संशोधकांचे म्हणणे आहे. याबाबत केलेल्या एका संशोधनातून ही झोप उडवणारी माहिती समोर आली आहे. दिवसाच्या झोपेबाबत आंतरराष्ट्रीय परिषदेत एक अहवाल सादर करण्यात आला. या अहवालात काही धक्कादायक दावे करण्यात आलेत. यानुसार जे दिवसा झोपतात. त्यांच्या अकाली मृत्यूची शक्यता वाढते. याबाबत सांख्यिकी माहितीही समोर आलीये. दिवसा झोप न घेणाऱ्यांच्या तुलनेत दिवसा झोपणाऱ्यांच्या अकाली मृत्युची शक्यता २० टक्के जास्त असते.**



दिवसा झोपल्याने, हृदयाच्या ठोक्यांच्या नैसर्गिक गतीवर परिणाम होऊ शकतो. दिवसा जास्त झोपल्याने मेंदूच्या क्षमतेवरही परिणाम होऊ शकतो. दिवसाची झोप अल्झायमर सारख्या आजाराचे कारण बनू शकते. हल्ली सोशल मीडिया किंवा कामाच्या वेगवेगळ्या वेळांमुळे दिवसा झोपण्याचं प्रमाण वाढतंय. रात्रीच्या झोपेची गरज दिवसाच्या झोपेतून भरून काढली जाते; पण ही झोप आता तुमच्या जीवाशी येऊ शकते. आपल्या झोपेच्या चक्रात मेलाटोनिन हे घटक महत्वाच असतं. मेलाटोनिन हे शरीरात नैसर्गिकरित्या आढळणारे हार्मोन आहे. हे झोपेला प्रेरित करणारे हार्मोन आहे. मेलाटोनिन हा मेंदूतील पाइनल ग्रंथीचा स्राव आहे. रात्रीच्या अंधारात, वेगाने मेलाटोनिन तयार होते, तेव्हा गाढ झोप यायला सुरुवात होते. जे लोक दिवसा झोपतात, त्यांची या हार्मोनच्या निर्मितीची प्रक्रिया मंदावते. त्यामुळे अशा लोकांना रात्री झोप लागणं अडचणीचं होते. दिवसा झोपल्याने मेंदूसंबंधी आजार येऊ शकतात. त्यामध्ये नैराश्य, चिंता, गोंधळ, स्मरणशक्ती कमी होणे, काहीही समजण्यात अडचण, तणाव यांचा समावेश होतो. तसेच चिडचिडेपणा आणि वागण्यात बदल होण्याची शक्यता असते.असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

cmyk

# सातारा जिल्ह्यात पावसाने उघडीप न दिल्याने खरीपाच्या पेरण्या रखडल्या

## शेतकऱ्यावर अस्मानी संकट;धक्कादायक आकडेवारी समोर

सातारा: सातारा जिल्ह्यातील पावसाने उघडीप न दिल्याने खरीपाच्या पेरण्या होऊच शकल्या नाहीत. मे महिन्यापासून पावसाचा जोर कायम राहिल्याने पेरण्यासाठी लागणारा वाफसा मिळाला नसल्याने शेतकऱ्यांना शेतात पिकच घेता आलेले नाही. यामुळे सातारा जिल्ह्यातील अनेक भागातील शेतकरी हवालदिल झाला असून काय करावं हे शेतकऱ्यांना समजेनासे झालं आहे. खरीपामध्ये भुईमुग,सोयाबीन, मका, कडधान्य आणि घेवडा पीक घेतलं जाते. मात्र ही पिके घेता न आल्याने त्याचा भविष्यात भावावर देखील परिणाम होणार असल्याचे शेतकऱ्याचे सांगणे आहे.

सातारा जिल्ह्यातील खरीप पेरणी हंगाम २०२५-२६ आकडेवारी लक्षात घेतली तर जिल्ह्यात ४०% हेक्टर क्षेत्रात खरीप हंगाम पेरणी झाली आहे. तर मागील वर्षी जुलै महिन्यातील ८७% जिल्ह्यात खरीप पेरणी झाली होती. मात्र मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षी ४७% पेरणी कमी झाली आहे..

तालुका निहाय खरीप हंगाम पेरणीची आकडेवारी : सातारा तालुका -सर्वसाधारण लागवड हेक्टर पीक क्षेत्र ५२ हजार २८८ आहे



तर सध्या पेरणी क्षेत्र १० हजार १८५ एकर झाली आहे.. जावली तालुका -सर्वसाधारण लागवड हेक्टर पीक क्षेत्र १८ हजार ९१४ आहे तर सध्या पेरणी क्षेत्र १ हजार ४८३ एकर झाली आहे.. पाटण तालुका- सर्वसाधारण लागवड हेक्टर पीक क्षेत्र६० हजार ४१०आहे तर सध्या पेरणी क्षेत्र १६ हजार ३६१ एकर झाली आहे. कराड तालुका- सर्वसाधारण लागवड हेक्टर पीक क्षेत्र ५८ हजार ६२९ आहे तर सध्या पेरणी क्षेत्र ३१ हजार १७८ एकर झाली आहे. कोरेगाव तालुका -सर्वसाधारण लागवड हेक्टर पीक क्षेत्र ३९ हजार ७७६ आहे तर सध्या पेरणी क्षेत्र ९ हजार ४५३ एकर झाली आहे. खटाव तालुका -सर्वसाधारण लागवड हेक्टर पीक क्षेत्र ४९ हजार १२४ आहे तर सध्या पेरणी क्षेत्र २८ हजार ८१८ एकर झाली आहे. माण तालुका -सर्वसाधारण लागवड हेक्टर पीक क्षेत्र ४०हजार २४५ आहे तर सध्या पेरणी क्षेत्र २६ हजार ६०९ एकर झाली आहे.

फलटण तालुका -सर्वसाधारण लागवड हेक्टर पीक क्षेत्र ३२ हजार ४५३ आहे तर सध्या पेरणी क्षेत्र १५हजार ५९२ एकर झाली आहे. खंडाळा तालुका -सर्वसाधारण लागवड हेक्टर पीक क्षेत्र १९ हजार ७१४ आहे तर सध्या पेरणी क्षेत्र ८ हजार ९०१ एकर झाली आहे..

वाई तालुका -सर्वसाधारण लागवड हेक्टर पीक क्षेत्र २० हजार ३७३आहे तर सध्या पेरणी क्षेत्र ८ हजार १९४ एकर झाली आहे.माबळेश्वर तालुका -सर्वसाधारण लागवड हेक्टर पीक क्षेत्र ४ हजार ४६६ आहे तर सध्या पेरणी क्षेत्र १हजार ८२० एकर झाली आहे. एकूण जिल्ह्यातील खरीप हंगाम पेरणी ३ लाख ९६ हजार ३९२ हेक्टर क्षेत्रावर होणे अपेक्षित होते मात्र सलग पावसामुळे १ लाख ५८ हजार ५९५ हेक्टर वर पेरणी झाली आहे.

# झेंडूच्या 'हिसार ब्युटी' या जातीपासून मिळते उत्तम उत्पन्न



झेंडूची विविधता हिसार सौंदर्य शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय आहे. ही एक बौने आकाराची जात आहे जी प्रत्यारोपणानंतर ४०-४५ दिवसांत फुले देण्यास सुरुवात करते. ही विविधता केवळ सजावटीसाठी वापरली जात नाही तर इतर अनेक कारणांसाठी देखील वापरली जाते. फुले देण्याच्या बाबतीत ते खूप प्रगत आहे आणि त्यावर दीर्घकाळ फुले येत राहतात.

झेंडूच्या फुलांची लागवड शेतकऱ्यांसाठी अत्यंत फायदेशीर मानली जाते. तज्ज्ञांच्या मते, शेतकरी शेती करून अधिक नफा मिळवू शकतात. झेंडू हे एक फूल आहे जे प्रत्येक भारतीय घरात पुजेपासून लग्नापर्यंत आणि इतर अनेक कार्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. काही ठिकाणी ती सजावटीसाठी वापरली जाते तर काही ठिकाणी हार म्हणून वापरली जाते. झेंडूचे विविध प्रकार शेतकऱ्यांसाठी अतिशय फायदेशीर असल्याचे अलीकडे बोलले जात आहे. या जातीला हिसार ब्युटी असेही म्हणतात.

१० टनांपेक्षा जास्त पीक :

झेंडूची विविधता हिसार सौंदर्य शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय आहे. ही एक बौने आकाराची जात आहे जी प्रत्यारोपणानंतर ४०-४५ दिवसांनी फुले देण्यास सुरुवात करते. ही विविधता केवळ सजावटीसाठी वापरली जात नाही तर इतर अनेक कारणांसाठी देखील वापरली जाते. फुले देण्याच्या बाबतीत ते खूप प्रगत आहे आणि त्यावर दीर्घकाळ फुले येत राहतात. तज्ञांच्या मते, जर ते २०२० सें.मी. १०० मीटर अंतरावर लागवड केल्यास एकरी १०.३ टनापर्यंतचे पीक मिळू शकते.

शेती कधी आणि कशी करावी : या जातीचे रोपटे तयार करण्यासाठी, त्याच्या बिया जुलै ते सप्टेंबर दरम्यान पेरल्या पाहिजेत. वाफ्यात बिया पेरल्यानंतर, बारीक शेणखताचा हलका थर लावा आणि बेड कोरड्या गवत किंवा पानांनी झाकून टाका. हे लक्षात ठेवावे की झाडांना हिवाळ्यात १०-१५ दिवसांच्या अंतराने आणि उन्हाळ्यात ५ ते ७ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. जर तुम्ही या जातीची पुनर्लावणी करत असाल तर खतांचा योग्य वापर करा म्हणजे त्याची वाढ चांगली होईल. झेंडू कोणत्या उद्देशांसाठी फायदेशीर आहे?: फुलांपासून रंग आणि उच्च दर्जाचे परफ्यूम काढले जाते आणि त्याच्या देठापासून आणि पानांपासून तेल काढले जाते जे खूप महाग आहे. वैद्यकीय क्षेत्रात याचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. झेंडूचा वापर अनेक प्रकारच्या रोगांसाठी केला जातो, ज्यामध्ये त्याचा वापर पोटाच्या समस्या, खोकला आणि सर्दीमध्ये खूप गुणकारी असल्याचे सिद्ध होते. झेंडूच्या पाकळ्यांपासून मलम आणि अर्क तयार केला जातो.

# जाणून घ्या हायड्रोपोनिक चारा आणि त्याचे फायदे

शेतकरी दूध विक्रीतून मिळणाऱ्या पैशातून कुटुंबाची आर्थिक गरज भागवतात.मात्र, गेल्या काही दिवसांपासून शेतीचं क्षेत्र कमी होत असल्याचे समोर आले आहे. शेतकऱ्यांसमोर चाऱ्याची समस्या मोठ्या प्रमाणावर निर्माण होत आहे. चाऱ्याच्या समस्येवर मार्ग काढण्यासाठी शेतकऱ्यासमोर हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाचा वापर करुन चारा उपलब्ध करण्याचा मार्ग उपलब्ध झाला आहे. शेतकरी हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाद्वारे १० दिवसांमध्ये चारा तयार करु शकतात. मक्याच्या बियांपासून फक्त हायड्रोपोनिक चारा ट्रे मध्ये पाणी शिंपडून चारा पिकवता येतो. या तंत्राचा वापर करून चारा तयार करण्यासाठी खूप कमी वेळ लागतो. हायड्रोपोनिक्स तंत्राद्वारे शेतकरी बांधवांना फक्त १० दिवसात चारा मिळू शकतो. हायड्रोपोनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करणे खूप महाग आहे, कारण त्यात खूप खर्च होतो.

१०. मात्र, स्थानिक बाजारपेठेत किंवा घरी उपलब्ध होणाऱ्या वस्तू आणि साधनं वापरून कमी खर्चात चारा पिकवता येऊ शकतो.

हायड्रोपोनिक चाऱ्याचे फायदे : हायड्रोपोनिक्स चाऱ्यामध्ये पारंपारिक चारा कोरडे अन्न किंवा धान्यापेक्षा जास्त पोषक असतो. त्यात उच्च कार्बोहायड्रेट, खनिजे आणि जीवनसत्त्वे असतात. पारंपारिक चाऱ्याच्या वाढवण्यासाठी अनेकदा दोन महिने लागतात, पण तुम्ही फक्त एका आठवड्यात हायड्रोपोनिक चारा वाढवू शकता. पारंपरिक चारा उत्पादनाच्या तुलनेत हायड्रोपोनिक चारा उत्पादनासाठी कमी पाणी लागते. एक किलो हायड्रोपोनिक चारा पिकवण्यासाठी फक्त ३ ते ४ लिटर पाणी आवश्यक आहे; दुसरीकडे, पारंपारिक चाऱ्यासाठी अंदाजे ७०-१०० लिटर पाणी लागते. कमी पाण्याची समस्या असतानाही हायड्रोपोनिक चारा वर्षभर नियमितपणे तयार करता येतो. हायड्रोपोनिक चारा पिकवण्यासाठी कोणत्याही रसायनांची किंवा कीटकनाशकांची गरज नसते. जनावरांच्या शरीरात प्रथिने, खनिजे, जीवनसत्त्वाच्या उपलब्धतेत वाढ होते. प्रथिने, जीवनसत्त्वे, फॉलिक ॲसिड, ओमेगा-३, स्निग्ध पदार्थ हरितद्रव्य मोठ्या प्रमाणात असतात. पशुखाद्याचा खर्च ४० टक्के कमी होतो. जनावरांच्या रोगप्रतिकारक शक्तीत वाढ होते. दुधाच्या फॅट मध्ये वाढ होते. किमान अर्धा लिटर दुधात वाढ होते. जनावरांची प्रजनन क्षमता सक्षम होते.प्रति किलो हायड्रोपोनिक्स चार्यामधील घटक : १. कॅल्शियम- ०.११ %, २. विटामीन - २५.०१ %, ३. विटामीन - ४५.०१ %, ४. विटामीन - २६.०३%, ५. प्रथिने- १३ ते २० % ६. रायझेस्टिक फायबर- ८०.९२



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६० : पावनखिंड झुंजवणार्या वीर बाजीप्रभू देशपांडे यांनी शिवाजी महाराज विशाळगडावर पोहोचल्याच्या खुणेच्या तोफांचे आवाज ऐकल्यावर 'आता मी सुखाने मरतो' असे म्हणून प्राण सोडला.
१८३७ : राणी व्हिक्टोरिया बकिंगहॅम पॅलेसमध्ये राहायला गेली. तेव्हापासून ते इंग्लंडच्या राजाचे/राणीचे अधिकृत निवासस्थान बनले.
१८६३ : सक्तीच्या सैन्यभरती विरोधात न्यूयॉर्क शहरात दंगा झाला.
१८०३ : साली राजा राम मोहन राय आणि अलेक्झांडर डफ यांनी आपल्या पाच विद्यार्थ्यांसोबत स्कॉटिश चर्च महाविद्यालयाची स्थापना केली.
१९०५ : कलकत्ता येथील साप्ताहिक वर्तमानपत्र 'संजीवनी' मध्ये पहिल्यांदा विदेशी मालाचा बहिष्कार करा म्हणून प्रकाशित करण्यात आलं.
१९०८ : लोकमान्य टिळकांवर दुसर्या राजद्रोहाच्या खटल्याचे काम सुरु झाले.
१९०८ : ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये स्त्रियांना भाग घेण्यास परवानगी.
१९२९ : जतिंद्रनाथ दास यांनी लाहोर तुरुंगात आपले आमरण उपोषण सुरू केले. या उपोषणातच त्यांचा मृत्यू झाला.
१९५५ : २८ वर्षीय रुथ एलीसला प्रियकराचा खून केल्याबद्दल फासावर चढविण्यात आले. हॉलो वे तुरूंगातली ही फाशी ग्रेट ब्रिटनमधली स्त्रीकैद्याची अखेरची फाशी ठरली.
१९७७ : रोहित्रावर वीज पडल्यामुळे न्यूयॉर्क शहरातील वीजपुरवठा दीर्घकाळ खंडित झाला.
१९८३ : श्रीलंकेत वांशिक हत्याकांड. ३,००० तामिळ व्यक्तींची हत्या. ४,००,००० हून अधिक तामिळींचे पलायन.
२००६ : ईराण देशांतील अणुबॉम्ब निर्माण प्रकरण संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेकडे देण्यात आले.
२०११ : मुंबई शहरात झालेल्या ३ बॉम्बस्फोटात २६ जण ठार तर १३० जण जखमी झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६३ : अँग्लो-इंडियन इजिप्ततज्ञ, पुरातत्वशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ, इतिहासकार आणि लोककलाकार तसचं, युनायटेड किंगडममधील पुरातत्व शाखेच्या प्राध्यापक मार्गारेट अलीस मुरे यांचा जन्मदिन.
१८९२ : केसरबाई केरकर जयपूर-अत्रौली घराण्याच्या शास्त्रीय गायिका (मृत्यू: १६ सप्टेंबर १९७७)
१९३० : माजी भारतीय क्रिकेटपटू व माजी भारतीय कसोटी क्रिकेट पंच स्वरूप किशन यांचा जन्मदिन.
१९४० : भारतीय विद्वान, कादंबरीकार, लघुकथा लेखक आणि इंग्रजी आणि हिंदी साहित्याच्या कवी सुनिता जैन यांचा जन्मदिन.
१९४२ : हॅरिसन फोर्ड अमेरिकन अभिनेता
१९४४ : रुबिक क्यूब चे निर्माते एरो रुबिक यांचा जन्म.
१९५३ : राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सन्मानित भारतीय तमिळ भाषिक कवी, गीतकार आणि कादंबरीकार वैरामुथू रामासामी यांचा जन्मदिन.
१९६४ : भारतीय क्रिकेट खेळाडू उत्पल चॅटर्जी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६० : पावनखिंड लढवून बाजीप्रभू देशपांडे यांनी स्वराज्यासाठी आपल्याल प्राणाचे बलिदान दिले.
१७९३ : फ्रेंच क्रांतिकारी ज्याँपॉल मरात यांचे निधन.
१९६९ : महर्षी न्यायरत्न धुंडिराजशास्त्री विनोद तत्त्वज्ञ, विचारवंत, योगी, स्वातंत्र्य सैनिक आणि लेखक. (जन्म: १२ जानेवारी १९०२)
१९६९ : बंगाली शिक्षणतज्ञ, लेखक, तत्वज्ञानी आणि पूर्व पाकिस्तानचे भाषाशास्त्रज्ञ मुहम्मद शाहिदुल्ला यांचे निधन.
१९८० : बोत्स्वानाचे पहिले राष्ट्राध्यक्ष सेरेत्से खामा यांचे निधन.
१९९० : अर्देशिर फुर्दोरजी सोहराबजी ऊर्फ 'बॉबी' तल्यारखान क्रीडा समीक्षक व समालोचक (जन्म: ? ? १८९७)
१९९४ : पं. कृष्णा गुंडोपंत तथा 'के. जी.' गिंडे शास्त्रीय (धृपद) गायक, संगीतकार व शिक्षक (जन्म: २६ डिसेंबर १९२५)
१९९५ : ज्ञानपीठ पुरस्कार विजेता भारतीय बंगाली भाषिक कादंबरीकार आणि कवी आशापूर्ण देवी यांचे निधन.
१९९५ : भारतीय पत्रकार आणि स्तंभलेखक तसचं, सुप्रसिद्ध भारतीय चित्रपट मसिक लेखिका देवयानी चौबाल यांचे निधन.
२००० : इंदिरा संत साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या कवयित्री व लेखिका (जन्म: ४ जानेवारी १९१४)
२००९ : निळू फुले संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी मराठी चित्रपट अभिनेते (जन्म: ? ? १९३०)
२०१० : मनोहारी सिंह भारतीय संगीत दिग्दर्शक, सैक्सोफोनिस्ट आणि चित्रपट संगीतकार तसचं, गीतकार आर. डी. बर्मन यांचे मुख्य संयोजक (जन्म: ८ मार्च १९३१)

# बंदिस्त वाफे तयार करणारे यंत्र वापरा ; कोरडवाहू जमीन पाणीदार बनवा

कोरडवाहू शेती ही नेहमी एकूण पडणाऱ्या पावसावर अवलंबून नसून ती पडणाऱ्या पावसाच्या पाण्यापैकी जमिनीत मुरणाऱ्या पावसाच्या पाण्यावर अवलंबून असते, हे लक्षात ठेवले पाहिजे. पावसाचे पाणी वाचविण्याचा सर्वांत कार्यक्षम आणि स्वस्त मार्ग जमिनीत मूलस्थानी जलसंधारणद्वारे मुरवून पाणी ठेवणे. माती आणि जलसंधारणाच्या प्रभावी पद्धतींपैकी एक म्हणजे शेतात बंदिस्त वाफे तयार करणे. उताराला आडवे वाफे व उभे वाफे समांतर अंतराने जोडून बंदिस्त वाफे तयार करता येतात. हे वाफे तयार करण्यासाठी जास्त प्रमाणात मजुरांची गरज असते. हे काम जास्त कष्टाचे असल्यामुळे मजुरीमुळे खर्च वाढतो.अशा परिस्थितीत बंदिस्त वाफे जर यंत्राने केले तर कमी खर्चात जास्त चांगल्या प्रकारे हे काम होते. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठातील अखिल भारतीय समन्वयीत कृषी अवजारे आणि यंत्रे संशोधन प्रकल्पामध्ये ट्रॅक्टरचलित फुले बंदिस्त वाफे बनविणारे अवजार विकसित केले आहे. या यंत्राने ६ मीटर लांबी व २ मीटर रुंदी असलेले बंदिस्त वाफे तयार करता येतात. वाफ्याच्या वरंब्याची उंची साधारणपणे २० ते २२ सेंटीमीचर राहते. यामुळे पडलेल्या पावसाचे पाणी मुरवणे किंवा वाहून जाणारे पाणी अडवणे शक्य होते.

यंत्राचे फायदे : जमिनीमध्ये ५० टक्के जास्त ओल साठवली जाते. पाण्याची आणि मातीची धूप रोखते, आर्द्रता वाचते आणि पिकाचे उत्पादन वाढते. या यंत्राच्या फार्मर्स फर्स्ट प्रकल्प, कृषी अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्प, राहुरी; कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प, सोलापूर प्रक्षेत्रावर चाचण्या घेण्यात आल्या. या यंत्राची प्रक्षेत्रीय कार्यक्षमता खूप चांगली आहे. त्यात रब्बी ज्वारीसाठी जमिनीत परतीच्या पावसाचे पाणी मुरविण्यासाठी बंदिस्त वाफे तयार केल्यामुळे रब्बी ज्वारीचे उत्पादन २ ते ३ क्विंटल पर्यंत वाढल्याचे आढळले.

वैशिष्ट्ये : हे यंत्र ३५ अश्वशक्ती किंवा त्यापेक्षा जास्त अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरने चालवता येते. या यंत्राने एका दिवसात ४ ते ४.५ हेक्टर क्षेत्रावर बंदिस्त वाफे तयार करणे शक्य आहे. यंत्राच्या वापरामुळे पारंपरिक पद्धतीपेक्षा खर्चामध्ये ३० ते ४० टक्के बचत होते. पावसावर अवलंबून असणाऱ्या म्हणजेच कोरडवाहू पिकांसाठी हे यंत्र जास्त फायदेशीर ठरते. उदा. ज्वारी, बाजरी, मका, डाळी आणि तेल बियाणे, काही नगदी पिके उदा. कापूस, एरंडेल आणि भुईमूग इ. परिणामी पिकांचे उत्पादन वाढते.



# कार्यकर्त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही-अमरसिंह पंडित

## आनंदवाडीचे सतिष चव्हाण यांच्यासह शेकडो कार्यकर्ते राष्ट्रवादीत दाखल

गेवराई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीबद्दलचा विश्वास जनसामान्यात वाढत आहे. राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या माध्यमातून सर्व समावेशक विकास कामे होत आहेत. याच जोरावर ग्रामीण भागातील शेकडो कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश करत आहेत. नवीन प्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यांनी या माध्यमातून आमच्यावर विश्वास व्यक्त केला आहे, कार्यकर्त्यांच्या या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही असे प्रतिपादन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केले. त्यांच्या उपस्थितीत मौजे आनंदवाडी येथील सतीश चव्हाण यांनी त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांसह माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला, यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.




गेवराई विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये मोठ्या प्रमाणावर इनकमिंग सुरु आहे. जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते पक्षप्रवेश करत आहेत. शुक्रवार, दि.११ जुलै रोजी तलवाडा जिल्हा परिषद गटातील मौजे आनंदवाडी येथील भाजपाचे सक्रिय कार्यकर्ते सतीश चव्हाण यांनी त्यांचे सहकारी ज्ञानेश्वर चव्हाण, रामेश्वर चव्हाण, अनिल चव्हाण, बालाजी गायकवाड, जयराम गायकवाड, सखाराम चव्हाण, भागवत चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, जयराम नरवडे, राहुल चव्हाण, दादा गायकवाड, लक्ष्मण चव्हाण, प्रदीप तांगडे, गहीनाथ तांगडे, रामेश्वर तांगडे, तुकाराम चव्हाण, भास्कर चव्हाण, अविनाश गायकवाड, गणेश गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, गणेश चव्हाण, अरविंद पवार, बळीराम चव्हाण, संतोष हातागळे, किशोर हातागळे, भैय्या हातागळे, अनिल हातागळे, रमेश हातागळे, विजय हातागळे, भीमा हातागळे, भरून हातागळे, जितेंद्र हातागळे, विजय हातागळे आदी शेकडो समर्थकांसह राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीमध्ये आनंदवाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. अमरसिंह पंडित यांनी सर्वांचे राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये स्वागत केले. यावेळी माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, माजी सभापती आसाराम मराठे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष दीपक आतकरे, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, राष्ट्रवादी युवकचे विधानसभा क्षेत्र अध्यक्ष गजानन काळे, माजी सरपंच विष्णू हत्ते, मनोज हजारे, सरपंच रामप्रसाद चाळक, विठ्ठल चव्हाण, रणजीत घुंबार्डे, सरपंच राधेश्याम चक्कर, बंटी सौंदरमल, लहू लोखंडे, विजय सुतार, नजीम कुरेशी, प्रकाश चव्हाण यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कारंजा टॉवरसाठी प्रशासनिक अधिकारी, लोकप्रतिनिधींच्या कार्याकडे लक्ष!

## प्रसिद्धी माध्यमांचे मनस्वी आभार -गंगाधरे,.युसूफ







बीड । प्रतिनिधी

ऐतिहासिक कारंजा टॉवर च्या परिपूर्ण नूतनीकरणासाठी प्रशासनिक अधिकारी व लोकप्रतिनिधींच्या कार्याकडे लक्ष देत असल्याचे मत रमेशराव गंगाधरे आणि एस.एम.युसूफ यांनी व्यक्त करत प्रसिद्धी माध्यमांचे आभार मानले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, ऐतिहासिक कारंजा टॉवर च्या परिपूर्ण नूतनीकरणासाठी सन २०१४ सालापासून लढा सुरू आहे. गेल्या ११ वर्षात याविषयी जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी, तहसीलदार एवढेच नव्हे तर जिल्हा पोलीस अधीक्षकांना सुद्धा वेळोवेळी निवेदने देण्यात आलेली आहेत. या लढ्यास लोकशाहीचे चौथे आधारस्तंभ असलेल्या पत्रकारिता क्षेत्रातूनही वेळोवेळी वाचा फोडण्यात आलेली आहे. या लढ्यास बीड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील वृत्तपत्रांकडूनही तेवढ्याच तोलामोलाचे सहकार्य मिळत आहे. यामुळे कारंजा टॉवर चा विषय आता फक्त बीड शहर किंवा जिल्ह्यापुरता मर्यादित न राहता मराठवाड्यासह महाराष्ट्रात सुद्धा पोहोचला आहे. कारंजा टॉवरसाठी नागरिक पुढे येऊन स्वखर्चाने एक-एक कामे मार्गी लावत आहेत. गेल्या काही महिन्यात लोकसहभागातून

कारंजा टॉवरसाठी ५ कामे झाली आहेत. तरीही उर्वरित १२ कामे अजून बाकी आहेत. याकरिता उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना सातत्याने निवेदन रुपात आठवण करून देण्याचे कार्य नित्यनेमाने केले जात आहे. शिवाय शासन-प्रशासन जागरूक व्हावे, याकरिता प्रसिद्धी माध्यमातून सातत्याने बातम्या व लेख प्रकाशित करण्यासाठी दिले जात आहे. मात्र शासन-प्रशासनाकडून अजूनही या ऐतिहासिक वास्तूकरिता ठोस कार्य करण्यासाठी पाऊल उचलले जात नाहीये. यामुळे लढा अजून संपलेला नाही तर सुरूच आहे. जोपर्यंत परिपूर्ण नूतनीकरण होणार नाही, तोपर्यंत ऐतिहासिक कारंजा टॉवरसाठी लढा सुरूच राहणार आहे. ऐतिहासिक कारंजा टॉवरसाठी प्रशासनिक अधिकारी व लोकप्रतिनिधींच्या कार्याकडे लक्ष ठेवणार असल्याचे मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी व्यक्त केले आहे.

# विकसित महाराष्ट्राच्या सर्वेक्षणात सहभाग होण्याचे आवाहन -जिल्हाधिकारी

जालना । प्रतिनिधी

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिनांक ६ मे, २०२५ ते २ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत १५० दिवसांचा कार्यक्रम राबविण्याची घोषणा केली आहे. त्यामध्ये विकसित महाराष्ट्र-२०४७ करिता तयार करण्याचा समावेश करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाची प्रचलित कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, पारदर्शी आणि सहजसुलभ होण्यासाठी कोणत्या प्रकारच्या धोरणात्मक बाबी असाव्यात, याबाबत जिल्ह्यातील नागरिकांचे अभिप्राय घेण्यात येणार आहे. राज्यशासनाच्या निर्देशानुसार 'विकसित महाराष्ट्र २०४७' साठी जनसहभाग वाढवण्याकरीता जालना जिल्हा प्रशासनामार्फत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७' या राज्य शासनाच्या दूरदृष्टीपूर्ण अभियानाच्या पार्श्वभूमीवर, जालना जिल्ह्यात स्थानिक पातळीवरील थेट प्रतिसाद आणि व्यापक जनसहभाग सुनिश्चित करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने विशेष जनजागृती मोहीम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही मोहीम जिल्ह्याच्या प्रत्येक भागात / क्षेत्रात पोहोचवण्यासाठी पुढील माध्यमांचा प्रभावी वापर करुन जिल्ह्यातील नागरिकांना या विशेष मोहिमेत सहभागी होण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे.

जिल्हा प्रशासनामार्फत या मोहिमेची माहिती विविध माध्यमातून जिल्ह्यातील सर्व नागरिकांपर्यंत पोहचविण्यात येत आहे. यामध्ये सर्व शासकीय कार्यालयांच्या समोर माहिती फलक लावण्यात येणार आहे. तलाठी, ग्रामसेवक, शिक्षक, आंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स



नगर परिषद मुख्याधिकारी व शहरी प्रशासनाचे सक्रीय सहकार्य विद्यार्थी व तरुण वर्ग यांचा सक्रीय सहभाग सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचा वैयक्तिक सहभाग बचतगट, शेतकरी उत्पादक संस्था (), आदिवासी बचत गट, सहकारी संस्था स्थापत्य अभियंते, डॉक्टर्स, उद्योजक, सामाजिक संस्था इत्यादींना या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे जालना जिल्ह्यातील प्रत्येक घटकाचा आवाज शासनापर्यंत पोहोचवणे आणि जिल्हा विकास प्रक्रियेत सर्वांचा सहभाग सुनिश्चित करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील नागरिकांना या सर्वेक्षणात सहभागी होण्यासाठी विविध माध्यमातून प्रोत्साहित करून आवाहन करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या क्युआर कोड व लिंक वरून नागरिकांना या सर्वेक्षणात सहभागी होता येणार आहे. सर्व नागरिकांनी या सर्वेक्षणात सहभागी होऊन 'विकसित महाराष्ट्र २०४७' बाबत आपली संकल्पना व आकांक्षाबाबत राज्य शासनाच्या संकेतस्थळावर लिंकवर तसेच क्यूआर कोड वरुन व्हॉटस्अप चॅटबॉटद्वारे आपला प्रतिसाद द्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

# निर्देशानुसारच प्रभाग रचनाच कायम ठेवा-दत्तात्रय ठोंबरे

बीड । प्रतिनिधी

गत चार वर्षापासून प्रलंबित असलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणूका लवकरच होवू घातल्या आहेत.मात्र प्रशासनातील स्थानिकचे अधिकारी हे सर्वोच्च न्यायालय व निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशाचे पालन करण्यात टाळाटाळ करत असल्याचा प्रकार उघडकीस आला असून या संबंधी खा.बजरंग सोनवणे यांचे कट्टर समर्थक माजी पं.स.सदस्य दत्तात्रय ठोंबरे यांनी सुप्रिम कोर्टाच्या आदेशानुसारच जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणाची प्रभाग रचना करावी अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. चुकीच्या पध्दतीने शासन निकष डावलून जर प्रभाग रचना झाल्यास त्या विरोधात मोठे जन आंदोलन उभे करण्याचा इशारा श्री.ठोंबरे यांनी दिला आहे.



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका होण्याच्या पार्श्वभूमीवर जि.प.गट व पं.स.गणाची प्रभाग रचना सध्या होत आहे. या संबंधी केज येथील माजी पं.स.सदस्य दत्तात्रय उर्फ पिंटू ठोंबरे यांनी केजच्या तहसीलदारांची भेट घेतली. निवडणूक आयोगाने केज तालूक्यात लोकसंख्येच्या आधारे एक नवीन जिल्हा परिषद गटाची जागा वाढवून तत्कालीन तहसीलदारांनी निवडणूक आयोगाच्या निर्देशाचे पालन करत गट,गणांची प्रभागरचना तयार केली होती. मात्र केजचे सध्याचे तहसीलदार हे राजकिय हस्तक्षेप वाढत असल्याचे सांगत प्रभागरचना बदलणार असल्याचे सांगतात. सदरील प्रकार हा अत्यंत गभीर असून सुप्रिम कोर्ट व निवडणूक आयोगाच्या आदेशाला हरताळ फासण्याचा उद्योग होत आहे. चुकीच्या पध्दतीने शासन निकष डावलून जर प्रभाग रचना झाल्यास त्या विरोधात मोठे जन आंदोलन उभे करण्याचा इशारा माजी पं.स.सदस्य दत्तात्रय उर्फ पिंटू ठोंबरे यांनी दिला आहे.

# दिव्यांग व्यक्तीसाठी विशेष रोजगार/स्वयंरोजगार मार्गदर्शन

जालना । प्रतिनिधी

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना या कार्यालयामार्फत जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त दि. ७ जुलै ते दि. १५ जुलै या कालावधीत कौशल्य सप्ताहाचे आयोजन करण्यात येत आहे.

जागतिक युवा कौशल्य दिन सप्ताहाच्या निमित्ताने दि.११ जुलै, २०२५ रोजी सामाजिक न्याय भवन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, जालना येथे दिव्यांग व्यक्तींसाठी विशेष रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. सदर मार्गदर्शन सत्रास विविध महामंडळाचे प्रतिनिधींनी उपस्थित राहून त्यांच्याकडे राबविण्यात येणा-या विविध योजनांची माहितीचे सादरीकरण करून योजनेचा लाभ घेण्यासाठीची कार्यपध्दती समजावून सांगितली. सदर सत्रास ५१ उमेदवारांनी उपस्थित राहून रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन सत्राचा लाभ घेतला. या प्रसंगी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी भुजंग रिठे, यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व आभार प्रदर्शन समुपदेशक डॉ. अमोल परिहार यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आत्माराम दळवी, प्रदीप डोळे, रवि पाडमुख, विशाल जगरवाल, दिपक पालवे, अमोल बोरकर यांनी परीश्रम घेतले.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाची थेट कर्ज योजना

बीड

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाकडून (मर्या.) सन २०२५-२६ वर्षात थेट कर्ज योजना राबवण्यात येत आहे. जिल्ह्यातील मातंग समाजातील अंतर्भूत १२ पोटजातींच्या पात्र इच्छुकांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक प्रणिता बोराडे (सरपते) यांनी केले आहे.महामंडळमार्फत राबविण्यात येणाऱ्या थेट कर्ज योजनेंतर्गत, मोबाईल रिपेअरिंग, इलेक्ट्रॉनिक वस्तू दुरुस्ती, फॅब्रिकेशन, ब्युटीपार्लर, टेलरिंग, फूड प्रोसेसिंग, किराणा दुकान, प्रिंटींग, कॅटरिंग सेवा, हॉटेलिंग, खेळ साहित्य विक्री, रेडीमेड कपड्यांचे दुकान अशा विविध लघु व्यवसायांसाठी कर्ज प्रकरणे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड येथे सकाळी १० ते सायंकाळी ६.१५ (सुट्टीचे दिवस वगळून) स्वीकारली जात आहेत. स्वत: अर्जदाराने मूळ कागदपत्रांसह उपस्थित राहून कर्ज प्रस्ताव दोन प्रतीत सादर करावा. त्रयस्थ, मध्यस्थांमार्फत कर्ज प्रकरण स्वीकारण्यात येणार नाही.

अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्ष असावे. वार्षिक उत्पन्न ₹ तीन लाखांपेक्षा अधिक नसावे. महामंडळाच्या योजनेचा पूर्वी लाभ घेतलेला नसावा, अशी अर्हता आहे. जात व उत्पन्न प्रमाणपत्र, रेशन व आधार कार्ड, पॅन कार्ड, दोन पासपोर्ट फोटो, व्यवसायाचे दरपत्रक, जागेचे पुरावे, ना-हरकत प्रमाणपत्र किंवा शॉप ॲक्ट, अनुभव व शैक्षणिक प्रमाणपत्रे, सिबिल क्रेडिट स्कोअर (५००), आधार संलग्न बँक खाते तपशील व स्व-स्वाक्षरीत प्रत, महामंडळाच्या विहित नमुन्यातील झेरॉक्स हस्तलिखित, टंकलिखित केलेला अर्ज (महामंडळाच्या कार्यालयात विनामुल्य उपलब्ध) व इतर अनुषंगिक कागदपत्रे प्रस्तावासोबत असावीत, असेही श्रीमती बोराडे यांनी कळवले आहे. याबाबत अधिक माहितीसाठी महामंडळाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी आवाहन केले आहे.

# गजानन विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी



राजुरी । प्रतिनिधी

येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रशांत पवळ हे होते.

आदर्श शिक्षण संस्था संचालित गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय राजुरी न. ता.जि.बीड येथे गुरुपौर्णिमेनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महामंडलेश्वर अमृत स्वामी महाराज, प्रा.सिद्धेश्वर क्षीरसागर हे उपस्थित होते. अमृत स्वामी महाराज यांनी आपल्या वाणीतून सर्वांना मंत्रमुग्ध केले. अध्यक्षीय भाषणामध्ये बोलताना प्रशांत पवळ यांनी गुरु आणि शिष्य यांच्यातील नाते व गुरुपूजन या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले .याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. सर्व शिक्षक,शिक्षिका, प्राध्यापक, प्राध्यापिका, यांचा विद्यार्थ्यांनी सत्कार करून गुरुपौर्णिमा निमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी उपमुख्याध्यापक शिंदे एस.एस., पर्यवेक्षक दगडे व्ही.एन., शेख एस.वाय, भोसले बी.एस, सर्व कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयदीप सरवदे यांनी केले व आभार प्रदर्शन नितीन शिंदे यांनी केले.कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# दिव्यांगांसाठी सुरेश माने यांची आक्रमक भूमिका

## फडणवीस सरकारकडे ८ प्रमुख मागण्यांचे निवेदन

बीड । प्रतिनिधी

राज्यातील दिव्यांग बांधवांच्या न्याय्य हक्कांसाठी रिपब्लिकन पक्ष ऑफ इंडिया (आठवले गट) दिव्यांग आघाडीने आक्रमक पवित्रा घेतला आहे. प्रदेशाध्यक्ष सुरेश धर्मराज माने यांनी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री व आरपीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन सरकारकडे दिव्यांगांच्या प्रमुख ८ मागण्यांचे निवेदन दिले असून या मागण्यांवर सहानुभूतीपूर्वक निर्णय घेण्याची मागणी त्यांनी केली.

यामध्ये संजय गांधी व श्रावण बाळ पेन्शन योजनेंतर्गत मिळणारे १५०० रुपये अनुदान गेली सहा महिने थकले असून, हे अनुदान वाढवून किमान ३ ते ४ हजार रुपये प्रति महिना करावे. तसेच इतर लाभार्थ्यांप्रमाणे दिव्यांग बांधवांना देखील घरकुलांसाठी कोणत्याही अटी-शर्तीशिवाय तात्काळ लाभ मिळावा, अशी मागणी करण्यात आली आहे. दिव्यांग



बांधवांसाठी व्यवसायासाठी दिले जाणारे बीज भांडवल १.५० लाखांवरून वाढवून ३ लाख रुपये करावे, सर्व बँकांकडून विना अट विना हमी व्यवसायासाठी कर्ज मिळावे, अशा महत्त्वाच्या मागण्या तत्काळ मान्य कराव्या अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रदेशाध्यक्ष सुरेश धर्मराज माने केली आहे. त्याचप्रमाणे २०१६ च्या शासन निर्णयानुसार प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने आपल्या वार्षिक उत्पन्नाच्या ५ टक्के निधी दिव्यांगांसाठी खर्च करणे बंधनकारक असताना त्याची अंमलबजावणी होत नाही, याकडेही लक्ष वेधण्यात आले. प्रत्येक जिल्ह्यात दिव्यांग भवन व पुनर्वसन केंद्र उभारणे, जिल्हा नियोजन समितीमध्ये होतकरू दिव्यांग प्रतिनिधींना स्थान देणे आणि दिव्यांग महामंडळ व मंत्रालयातील पद भरती तात्काळ करणे, या मागण्यांचाही समावेश आहे.''ही केवळ मागणी नसून, दिव्यांग समाजाच्या अधिकारासाठीचा आमचा निर्धार आहे. शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही, तर ढील काळात व्यापक आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल.'' दिव्यांग बांधवांच्या सामाजिक, आर्थिक आणि शासकीय सहभागाची दखल घेण्याची ही वेळ असून, या मागण्या केवळ सहानुभूतीच्या दृष्टिकोनातून नव्हे तर हक्काच्या भूमिकेतून मान्य कराव्यात, असा स्पष्ट इशारा प्रदेशाध्यक्ष सुरेश माने यांनी दिला आहे.

# पंचायत समिती येथे सरपंच व ग्रामसेवक समन्वयक बैठक



जालना । प्रतिनिधी

ग्रामपंचायत स्तरावरील विकास कामांना गती देण्यासाठी पंचायत समिती मंठा येथे समन्वय बैठक सरपंच परिषद अध्यक्ष अमोल मोरे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसेवक संघटनेच्या संयुक्त विद्यमाने समन्वय बैठकीचे आयोजन केले होते या प्रसंगी समन्वय बैठकीला जिल्हा परिषद सदस्य पंजाबराव बोराडे,आनंदराव जाधव, गटविकास अधिकारी संतोष गगनबोने यांची प्रमुख उपस्थिती होती. समन्वय बैठकीच्या माध्यमातून सरपंच व ग्रामसेवक यांच्या तील गाव पातळीवर काम करत असताना येणाऱ्या अडचणीवर कशाप्रकारे उपाययोजना करण्यात येईल. याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली.

सरपंच परिषदेच्या माध्यमातून तालुकाध्यक्ष अमोल मोरे व सहकार्याच्या वतीने दर तीन महिन्यांला बैठक घेण्यात येईल येईल असे सांगितले.ग्रामीण भागात ग्रामपंचायत स्तरावर काम करत असताना अनेक अडचणी येतात त्या अडचणी येतात प्रशासकीय पातळीवर सोडवण्याचा करणार असल्याचे अमोल मोरे यांनी सांगितले .ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र भाऊ पवार ,सरपंच परिषदचे कार्याध्यक्ष सुनीलराव ठाकरे, कोषाध्यक्ष बाबाजी जाधव, उपाध्यक्ष संतोषराव सरोदे, गणेशराव चव्हाण यांच्यासह मंठा तालुक्यातील ग्रामपंचायतीतील ग्रामसेवक सरपंच यांची उपस्थित होती.

# सालगड्याला वाचवण्यासाठी गेलेले सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्याचे अपहरण करून मारहाण

## राजाराम सिरसट गंभीर जखमी,जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू







बीड । प्रतिनिधी

बाराशे रुपयासाठी ऊसतोड कामगाराचे मुकादमाने अपहरण केल्याची माहिती मिळताच सालगड्याला वाचवण्यासाठी गेलेले सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांना ऊसतोड मुकाद म आणि त्याच्या साथीदारानीन बेदम मारहाण केल्याची घटना काल शुक्रवार दिनांक ११ रोजी माजलगाव तालुक्यातील लऊळ गावात घडली. या घटनेमध्ये सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

माजलगाव तालुक्यातील किट्टीआडगाव येथील रहिवासी असलेले सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांच्याकडे शेतात काम करण्यासाठी असणारा शेतगडी विश्वनाथ पंडित यांच्याकडे ऊसतोड मुकादम शेख राजू शेख बाबू रा. मंजरथ ता. माजलगाव जि.बीड याचे बाराशे रुपये देणे होते. या बाराशे रुपयांसाठी या मुकादमाने व त्याच्या साथीदारांनी शेतगडी विश्वनाथ पंडित यांचे शुक्रवार दिनांक ११ रोजी सकाळी दहा वाजता अपहरण केले. त्यानंतर त्याला मारहाण करायला सुरुवात केली. त्याने स्वतःचा बचाव करण्यासाठी शेत मालक सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांना फोन करून मारहाण होत असल्याची माहिती दिली. सदर प्रकरणाची माहिती मिळताच सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांनी संबंधित मुकादमा कडे फोनवरून शेतगड्याकडील पैशासंदर्भात विचारले असता मुकादमाने शेतगडी विश्वनाथ पंडित यांच्याकडे दीड लाख रुपये आहेत. दीड लाख रुपये द्या आणि शेतगड्याला घेऊन जा असे सांगितले. त्यामुळे राजाराम सिरसट यांनी दीड लाख रुपये दिल्यास तुम्ही माझ्या शेतगड्याला सोडणार का? असे विचारताच त्यांनी पैसे घेऊन या त्याला सोडतो असे सांगितले. त्यानंतर राजाराम सिरसट यांनी घरी जाऊन दीड लाख रुपये घेतले व मुकादमाने सांगितलेल्या ठिकाणी गेले. यावेळी शेत गड्याने दीड लाख रुपये देऊ नका असे सांगितले. त्यामुळे मुकादम शेख राजू शेख बाबू आणि त्याच्या साथीदारानी शेत गड्यासह शेत मालक सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट

◀◀ पान ३ वर

## मुकुंदराज कड्यावरून युवतीचा आत्महत्येचा प्रयत्न; पोलिसांच्या तत्परतेमुळे वाचला जीव

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील मुकुंदराज मंदिराजवळील कड्यावरून उडी घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका युवतीचा जीव पोलीस निरीक्षक शरद जोगदंड व त्यांच्या सहकाऱ्यांनी वाचविला. राधा नरेश लोमटे (वय २२, रा. खडकपुरा, अंबाजोगाई) असे त्या युवतीचे नाव आहे. गंभीर जखमी झालेल्या राधावर सध्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.





प्राप्त माहितीनुसार, आज दुपारी सुमारे बारा वाजता राधा लोमटे ही घरातून निघून थेट मुकुंदराज टेकडीवर गेली. मंदिराच्या कड्यावरून तिने थेट खाली उडी घेतली. घटनास्थळी काही नागरिक उपस्थित होते. त्यांनी प्रसंगावधान राखून तातडीने अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधला.घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, पोलीस उपनिरीक्षक पवार, पोलीस कर्मचारी कांदे, वडकर, मुंडे, चादर आणि चालक जरगर यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. तिथे पोहोचून त्यांनी तात्काळ खाली उतरून युवतीला जिवंत अवस्थेत वर आणले व तिला तातडीने रुग्णवाहिकेतून उपचारासाठी

◀◀ पान ३ वर

## पवार- मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त अंबाजोगाई शहरात सेवा सप्ताहाचे आयोजन

### राजकिशोर मोदी व राजेश्वर चव्हाण यांच्या पुढाकाराने १५ ते २२ जुलै दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष ना अजितदादा पवार तसेच राज्याचे माजी कृषीमंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा अंबाजोगाईचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी तसेच जिल्हाध्यक्ष ॲड राजेश्वर चव्हाण यांच्या संकल्पनेतून व पुढाकाराने अंबाजोगाई शहरात १५ जुलै ते २२ जुलै २०२५ या कालावधीत सेवा सप्ताहाचे भव्य असे आयोजन करण्यात आले आहे. हा सेवा सप्ताह राज्याचे उपमुख्यमंत्री





मा. अजितदादा पवार व माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त साजरा करण्यात येणार असून ''सात दिवस सात उपक्रम'' या संकल्पनेवर आधारित सामाजिक कार्यक्रमांची मालिका राबवण्यात येणार आहे.

राजकिशोर मोदी व राजेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या सप्ताहात आरोग्य, पर्यावरण, स्वच्छता, शिक्षण व जनजागृती यांसारख्या विविध विषयावर आधारित हे समाजोपयोगी उपक्रम राबवले जाणार आहेत. समाजातील प्रत्येक घटकाला स्पर्श करणाऱ्या या उपक्रमांमुळे अंबाजोगाईमध्ये सेवाभावाची सकारात्मक अशी लाट निर्माण होणार आहे.

रक्तदान शिबिराने सेवा सप्ताहाचा शुभारंभ

मंगळवार १५ जुलै रोजी युवा वर्गामध्ये समाजसेवेची

◀◀ पान ३ वर

## पाटोद्यात कंत्राटी कर्मचारी संपावर तर तालुका आरोग्य अधिकारी गैरहजर

पाटोदा । प्रतिनिधी

तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत असणारे आरोग्य कंत्राटी कर्मचारी हे दि.१० पासून विविध मागण्यांसाठी संपावर गेली असून तर तालुका आरोग्य अधिकारी शुक्रवार दि.११ रोजी गैरहजर असल्यामुळे आरोग्य सेवा तालुक्यातील कोलडली होती. याकडे वरिष्ठांने लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे. याबाबत अधिक माहिती अशी की सध्या तालुक्यामध्ये साथ रोगाची लागण चालू असून डेंगू. मलेरिया. सह गोचिडताप यामुळे नागरिकासह लहान बालके या साथीमुळे खाजगी दवाखान्याचा आधार घेत असून प्राथमिक आरोग्य केंद्रामधील कंत्राटी कर्मचारी संपावर गेले आहेत तर तालुका अधिकारी हे गैरहजर दि. अकरा रोजी असल्यामुळे तालुक्यातील आरोग्य सेवा कोलमडली होती. यामुळे गोरगरीबाना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे तरी याकडे तात्काळ वरिष्ठांने लक्ष देऊन साथ रोग संदर्भात उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी नागरिकांतून होत आहे

## पालखी मार्गच्या अपुर्ण कामाबाबत दाखल अवमान याचिकेत मुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता यांना उच्च न्यायालयाची नोटीस

पाटोदा । प्रतिनिधी

पैठण पंढरपूर पालखी मार्ग २०१७ रोजी राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित होऊन सदरील कामाच्या निविदा निघून काम सुरू करण्यात आले होते . सदरील ७५२ ई राष्ट्रीय महामार्ग पैठण मुंगी, बोधेगाव, घोगसपारगाव, उखंडाचकला, मिडसांगवी, शिरूर कासार, राक्षस भुवन, कारेगाव, डोंगरकिन्ही, चुंबळी, पाटोदा, पारगावघुमरा, दिघोळला जोडला जाऊन पुढे तो खर्डा मार्गे पंढरपूरकडे जाणारा आहे.

सदरील मार्गाचे काम सुरू होउन जवळजवळ ८ वर्षे झालेली आहेत, परंतु अनेक ठिकाणी सदरील रोडचे कामे अपूर्ण स्थितीत पडलेले असून रोड खोदल्यामुळे लोकांना धुळीचा व खड्ड्याचा त्रास होत आहे. अनेक ठिकाणी पुल कम्प्लीट झालेले नाहीत. सदरील पैठण पंढरपूर मार्गामुळे या भागातील लोकांना दळणवळणासाठी अत्यंत जवळचा व चांगला रोड असल्यामुळे व मुख्यतः वारकऱ्यांना पैठण ते पंढरपूर या वारी करण्यासाठी अत्यंत सुखकर मार्ग होणार आहे परंतु गेल्या ८ वर्षांमध्ये सदरील काम वेगवेगळ्या कारणाने व संबंधित ठेकेदार तसेच अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे रखडत पडलेले आहे, या संदर्भामध्ये पाटोदा येथील नागरिक महादेव नाना नागरगोजे तसेच ह.भ.प. रामकृष्ण गणपतराव रंधवे, चक्रपाणी लक्ष्मणराव जाधव यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, जिल्हाधिकारी बीड, सहाय्यक अभियंता राष्ट्रीय महामार्ग उपविभाग माजलगाव यांना वारंवार निवेदने देऊन सदरील काम लवकरात लवकर करावे अशा विनंत्या केल्या होत्या तसेच यापूर्वी सदरील रोड संदर्भामध्ये काँ. नागरगोजे यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन व मोर्चे काढण्यात आली होती त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी वरील काम ऑगस्ट २०२३ पर्यंत करण्यात येईल असे आश्वासनही दिले होते, परंतु त्यानंतरही सदरील काम पूर्ण करण्यात आलेले नाही व त्यामुळे लोकांचे अतोनात हाल होत आहे या सर्व बाबींचा विचार करून वरील तिघांनी माननीय उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठांमध्ये जनहित याचीका क्र.२२/२०२४ ॲड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांच्या मार्फत दाखल केली होती. सदरील याचीकेत पैठण-पंढरपूर महामार्गाचे काम ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत पुर्ण

◀◀ पान ३ वर

## पाटोद्यात मंगळवारी ५९ सरपंच पदाची आरक्षण सोडत

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील असणाऱ्या ५९ ग्रामपंचायतीच्या २०२५ ते २०३० पर्यंत होणाऱ्या निवडणुकांसाठी सरपंच पदाचे आरक्षण मंगळवार दि.१५ रोजी सोडत होणार असून तरी या आरक्षण सोडतला उपस्थित राहावे असे आवाहन तहसीलदार दत्तात्रय निलावड यांनी म्हटले आहे याबाबत अधिक माहिती अशी की पाटोदा तालुक्यातील ५९ ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण सोडत तहसील कार्यालय पाटोदा येथे मंगळवार दि.१५/७/२०२५ रोजी आरक्षण सोडत होणार आहे असून यामध्ये अनुसूचित जाती जमाती ६ ओबीसी १६ ओपन.३७ असे ५९ ग्रामपंचायतीचे आरक्षण सोडत काढण्यात येणार असल्याचे यावेळी तहसीलदार दत्तात्रय निलावाड यांनी सांगितले.

## आमदार सुरेश धस यांनी घेतली शेळके कुटूंबीयांची भेट

आष्टी । प्रतिनिधी

अहिल्यानगर-पुणे महामार्गावर जातेगाव फाटा शिवारात आमदार सुरेश धस यांच्या मुलाच्या कारची धडक बसून,दुचाकीवरील हॉटेल व्यावसायिकाचा मृत्यू झाला.त्यानंतर या अपघाताचे सोशल मिडियावर विरोधकांनी भांडवल करत आगडोंब उठविला होता.हा अपघात आहे त्यावर पोलिस सविस्तर तपास करतील असे सांगत शुक्रवार (दि.११)रोजी सायंकाळी



विधानसभेचे अधिवेशन आटोपून आष्टीकडे येताना आमदार सुरेश धस हे मयत नितीन शेळके यांच्या घरी जाऊन भेट झालेल्या दुर्दैव घटनेबद्दल खंत व्यक्त करत कुटुंबियांना धीर दिला.

सोमवारी (७ जुलै) रात्री साडेदहा

◀◀ पान ३ वर

## शिवछत्रपतींच्या स्वराज्याचा जगभरात डंका

### माजलगाव भाजपाच्या वतीने जल्लोष साजरा



माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांना जागतिक वारसाचा दर्जा मिळाला आहे.

१२ किल्ल्यांची नावे युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत झळकली आहेत! शिवछत्रपतींच्या स्वराज्याचा जगभरात डंका , महाराजांची नीती पाहून युनोस्कोतील अधिकारी देखील आश्चरचिकित झाले ही

◀◀ पान ३ वर

## फुले पिंपळगावच्या दलितांची जमीन हडप करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा

### अनु.जाती आयोगाची जिल्हा पोलीस अधिक्षकांना नोटीस

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील फुले पिंपळगाव शिवारातील गटनं. २० मध्ये असणाऱ्या दलितांची जमीन ५३ आर एवढी जमीनीवर अकृषिक परवाना घेऊन सुनील तौर,के.एन.परळीकर,भुमि अभिलेख उपअधीक्षक, माजलगाव, एस.एन.गायकवाड, मोजणी अधिकारी भुमिअभिलेख, माजलगाव,किसन भानुदास जाधव सह तत्कालीन तहसीलदार, माजलगाव, राणोजी भागुजी जोगदंड,मंडळाधिकारी केसापुरी या सर्वांनी माजलगावचे माजी नगराध्यक्ष शेख मंजूर यांच्या संगनमताने कटकारस्थान केल्याच्या तक्रारी पोलीस निरीक्षक माजलगाव शहर व जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्या कडे करून उपरोक्त व्यक्तीं विरोधात गुन्हे दाखल करण्याची मागणी केली होती.पण यात गुन्हे करण्यात आले नाही म्हणुन मुख्य तक्रारदार मनोज साळवे तथा नमुद गट नंबर मधील शेतकरी रा.फुलेपिंपळगाव यांनी अनुसूचित जाती आयोग महाराष्ट्र व गोवा,भारत सरकार कडे संबंधित सर्व दस्तऐवज सादर करून तक्रार केली होती यावर आयोगाने दखल घेऊन पोलीस अधीक्षक, बीड यांनी चौकशी करून गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते.यानंतर पोलीसांनी चौकशी करून फौजदारी गुन्हे दाखल

◀◀ पान ३ वर

## सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने वन महोत्सव साजरा

**बीड । प्रतिनिधी**

**सामाजिक वनीकरण बीड च्या वतीने वृक्षदिंडी व वृक्षारोपनाचा कार्यक्रम विभागीय वनअधिकारी श्रीनीवास लखमावाड यांच्या संकल्पनेतुन व श्रीमती बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली वनमहोत्सव कार्यक्रमांतर्गत वनपरिक्षेत्र अधिकारी सामाजिक वनीकरण बीड यांच्या वतीने वृक्षदिंडी व वृक्षारोपनाचा कार्यक्रम मौजे कोल्हेरवाडी येथील श्री शहागीरबाबा विदयालय व जि.प.प्रा. शाळा कोल्हेरवाडी तसेच ग्रामपंचायत कार्यालय कोल्हेरवाडी यांच्या संयुक्तीकपने सदरील कार्यक्रम साजरा करण्यात आला. महेश्वारानंद गिरी महाराज मठाधिपती कोल्हेरवाडी व कशिनाथ महारज रांजवन यांच्या हस्ते बेलाच्या झाडाचे पुजन करुन वृक्षदिंडी सुरवात केली.**




प्रमाणात सहभाग सदरील कार्यक्रामाचे नियोजन वनपरिमंडळ अधिकारी एस. एम. ससाणे यांनी केले तसेच सदरील कार्यक्रमास मौजे कोल्हेरवाडी येथील कशिनाथ महाराज रांजवन सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य व इतर प्रतीष्ठीत नागरीक सहभागी झाले. तसेच येथील श्री शहागीरबाबा विदयालय व जि.प.प्रा.शाळा येथील सर्व विउदयाथी, शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकवृद यांनी मोठया नोंदविला. सदरील कार्यक्रामा वेळी लिपीक विभागीय वन अधिकारी वीर यांनी मुलांना मार्गदर्शन केले. तसेच श्रीमती एस.एम. ससाणे यांनी विदयार्थी व उपस्थिती.

## शिक्षकांच्या प्रेरणेतूनच विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास साधला जाईल –डॉ.सुरेंद्र आलूरकर

**माजलगाव । प्रतिनिधी**

**शिक्षकांच्या प्रेरणेतूनच विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास साधला जाईल असे प्रतिपादन भा.शि.प्र. संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात आयोजित विचारवेध वार्षिक अंक प्रकाशन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.**




पुढे बोलताना ते म्हणाले की, शिक्षक हाच खऱ्या अर्थाने समाजाचा विकास करू शकतो. विद्यार्थ्यांमध्ये संप्रेषण प्रक्रिया जागृत करण्याचा मूलभूत घटक म्हणजे शिक्षकच होय. शिक्षकांनी जर ठरवले तर समाजामध्ये अमुलाग्र बदल घडवून आणू शकतात. येणाऱ्या काळात भारत महासत्ता बनत आहे हे फक्त युवकांच्या कर्तुत्वावरच. आजच्या युवकांनी जर ठरवले तर ते भविष्यात भारत महासत्ता लवकरच बनवू शकतील. त्या दृष्टीने आजच्या गुरुपौर्णिमेच्या अशा विविध कार्यक्रमांमधून गुणवंत विद्यार्थ्यांचा आपण जेव्हा संस्था म्हणून,महाविद्यालय म्हणून सत्कार करतो तेव्हा आपले विद्यार्थी अशा कार्यक्रमांमधून प्रेरणा घेऊन भविष्यात नक्कीच यशस्वी होतील व आपल्या देशाचे नाव उज्वल करतील असा आशावाद त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला. याप्रसंगी केंद्रीय कार्यकारणी सदस्य अमरनाथ खुर्पे यांनी देखील शुभेच्छा पर मनोगत व्यक्त केले. त्यावेळी ते म्हणाले की, शैक्षणिक घटना म्हणून आजच्या कार्यक्रमाची इतिहासात नोंद होईल. हा सन्मान किंवा सिद्धेश्वर महाविद्यालय प्रेरणा पुरस्कार जो महाविद्यालयाने सुरू केला आहे तो खऱ्या अर्थाने महाविद्यालयातील शिक्षक कार्यकर्त्यांमध्ये प्रेरणा निर्माण व्हावी हा त्या पाठीमागचा उद्देश आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणे जिल्हा: कारेगावात चार बांगलादेशी नागरिकांना अटक

## बनावट आधार कार्डासह अवैध वास्तव्याचा पर्दाफाश

रांजणगाव गणपती: शिरूर तालुक्यातील कारेगाव येथे अवैधरित्या वास्तव्य करणाऱ्या चार बांगलादेशी नागरिकांना रांजणगाव एमआयडीसी पोलिस आणि पुणे ग्रामीण दहशतवाद विरोधी पथकाने संयुक्त कारवाईद्वारे ताब्यात घेतले आहे. बनावट आधार कार्ड वापरून गेल्या दोन वर्षांपासून हे नागरिक बेकायदेशीरपणे वास्तव्य करत असल्याचा खुलासा या कारवाईत झाला आहे.



अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये १) कमरोल रमजान शेख (वय ३२, रा. दामोदर, ठाणे फुलताला, जिल्हा खोलना, बांगलादेश), २) अकलस मजेद शेख (वय ३९, रा. उसला, ठाणे पोटालीपाडा, जिल्हा गोपालगंज, बांगलादेश), ३) मोहम्मद अब्दुल्ला मलिक (वय ३५, रा. मादपपाशा, तालुका कालिया, जिल्हा नोडाइल, बांगलादेश) आणि ४) जाहिद अबूबकर शेख (वय ३०, रा. पिडोली, तालुका कालिया, जिल्हा नोडाइल, बांगलादेश) यांचा समावेश आहे. हे सर्व सध्या कारेगाव, तालुका शिरूर, जिल्हा पुणे येथे राहत होते. त्यांना आज पहाटे ५ वाजता अटक करण्यात आली.

पोलिस तपासात असे आढळून आले की, हे चारही बांगलादेशी नागरिक कोणत्याही वैध प्रवासी कागदपत्रांशिवाय किंवा भारत सरकारने नेमून दिलेल्या मार्गाशिवाय घुसखोरीच्या मार्गाने भारतीय हद्दीत प्रवेश करून गेल्या दोन वर्षांपासून कारेगावात बनावट आधार कार्ड वापरून अनधिकृतपणे वास्तव्य करत होते. पुणे ग्रामीण दहशतवाद विरोधी शाखेचे पोलीस कर्मचारी मोसिन बशीर शेख यांना गोपनीय माहितीच्या आधारे कारेगावात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांची खबर मिळाली होती. या माहितीच्या अनुषंगाने रांजणगाव एमआयडीसी पोलिस आणि दहशतवाद विरोधी पथकाने संयुक्तपणे छापा टाकून सदर चार जणांना ताब्यात घेतले. त्यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

अटक केलेल्या आरोपींना आज न्यायालयात हजर केले असता, त्यांना १५ जुलै २०२५ पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. सदर कारवाई पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे आणि दहशतवाद विरोधी शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश पवार यांच्या नेतृत्वात पार पाडली गेली.

या कारवाईत पोलीस अधिकारी अविनाश थोरात, विशाल गव्हाणे, दत्तात्रय शिंदे, विशाल भोरडे, रवींद्र जाधव, मोसिन शेख, ओमकार शिंदे, योगेश गुंड, संतोष साळुंखे आणि आकाश सवाने यांच्या पथकाने सहभाग घेतला. पुढील तपास पोलीस अधिकारी नीलकंठ तिडके करत आहेत. ही कारवाई परिसरात अवैध वास्तव्यास आळा घालण्याच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे.

# कोंढणपूर फाट्यावर गाडी लावण्यावरून तुंबळ हाणामारी; एक जण आयसीयूत, दोन गुन्हे दाखल



नसरापूर : कोंढणपूर फाटा (ता. हवेली) येथे गाडी लावण्याच्या किरकोळ वादातून दोन गटांत तुंबळ हाणामारी झाली. या घटनेत एक तरुण गंभीर जखमी होऊन पुण्यातील रुग्णालयात आयसीयूमध्ये उपचार घेत आहे. दोन्ही गटांनी परस्परविरोधी तक्रारी दाखल केल्या असून, राजगड पोलिसांनी दोन स्वतंत्र गुन्हे नोंदवले आहेत.

गुरुवारी (दि. १० जुलै) संध्याकाळी साडेसहा वाजता खेड-शिवापूर येथील राधाकृष्ण हार्डवेअर दुकानासमोर अर्जुन रजपूत (रा. शिवापूर) याने दुचाकी उभी केल्यावर मंथन वाडकर (रा. कोंढणपूर फाटा) याच्याशी वाद झाला. मंथनने गाडी लाथ मारून पाडल्याचा आरोप अर्जुनने केला. त्यानंतर मंथन, लोकेश, अदिनाथ वाडकर आणि चार अनोळखी व्यक्तींनी अर्जुनवर दांडके, खुर्ची आणि हाताने मारहाण केली. तसेच, तुला आणि तुझ्या खानदानाला संपवीन, अशी धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.

दुसऱ्या दिवशी (दि. ११ जुलै) अर्जुन आणि त्याच्या नातेवाइकांनी मंथनच्या घरी जाऊन अदिनाथ आणि लोकेश वाडकर यांना मारहाण केली. घरातील वस्तूंचे नुकसान करून शिवीगाळ केली. यात लोकेशच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून, तो आयसीयूत आहे. या प्रकरणी राजगड पोलिसांनी गुन्हे क्रमांक २६९/२०२५ आणि २७०/२०२५ दाखल केले आहेत.

पहिल्या घटनेनंतर तात्काळ कारवाई झाली असती तर दुसरी घटना टाळता आली असती, अशी स्थानिकांची चर्चा आहे. तपासाधिकारी पो. ना. मिस्त्री यांनी सांगितले, पहिल्या प्रकरणात कायदेशीर अटक शक्य नव्हती, पण दुसऱ्या घटनेतील गंभीर दुखापतीमुळे कठोर कारवाई होईल. पोलीस निरीक्षक अण्णा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

# उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी समन्वय ठेवा -डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार

पुणे - उद्योग क्षेत्राच्या समस्या सोडविण्यासाठी मुख्यमंत्री गंभीर आहेत. उद्योगांना सर्व पायाभूत सोयीसुविधा पुरवून त्यांच्या समस्या सोडविणे, ही प्रशासनाची जबाबदारी असून, त्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आदेश विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले.

जिल्ह्यातील विविध औद्योगिक संघटनांसोबत उद्योजकांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीबाबत विधानभवन येथे आयोजित बैठकीत ते बोलत होते. या वेळी पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पीएमआरडीएचे अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला, पीएमपीएमएलच्या अध्यक्षा दीपा मुधोळ- मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आदी उपस्थित होते.डॉ. पुलकुंडवार म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हिंजवडी-माण आयटी पार्क क्षेत्रात पावसाचे पाणी साचणे, वीज खंडित होणे आदी समस्यांच्या अनुषंगाने नुकतीच विधानभवनात बैठक घेऊन उद्योगांची वृद्धी होण्यासाठी कटाक्षाने लक्ष दिले आहे. त्यादृष्टीने सर्व अधिकाऱ्यांनी आपापसांत समन्वयाने गतीने



कार्यवाही करावी.

शेखर सिंह म्हणाले, की चिंचवड येथील ईएसआयसी रुग्णालयात अत्याधुनिक उपचार मिळण्यासाठी उपकरणे सेवा सुविधांसाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करू. रुग्णालयाला सीएसआर फंडातून उपकरणे उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

जिल्हाधिकारी डुडी म्हणाले, पिंपरी-चिंचवड, चाकण, रांजणगाव, हिंजवडी, तळेगाव, जेजुरी, बारामती आदी सर्वच औद्योगिक क्षेत्रांत, तसेच क्षेत्राबाहेरील उद्योगांसाठी पायाभूत सुविधा पुरविण्यावर भर देण्यात येणार आहे. त्यासाठी सर्व संबंधित विभागांनी उद्योग संघटनांकडून समस्या जाणून घ्याव्यात.

मुधोळ- मुंडे यांनी सांगितले, की कंपन्यांनी आपल्या कामगारांसाठी पीएमपीएमएलच्या बसेसची मागणी केल्यास वेळा आणि मार्ग निश्चित करून बसेस सुरू करण्यात येतील.

विभागीय आयुक्तांचे आदेश

- एमआयडीसीने उद्योगांना वीज, पाणी, रस्ते आदी सुविधा द्याव्या
- रस्त्यांवरील खड्डे संबंधित यंत्रणांनी भरून घ्यावेत
- क्षेत्रातील व क्षेत्राबाहेरील भागात कचरा, गटारांची स्वच्छता करावी
- महावितरणने फीडर, उपकेंद्रे, वीजवाहिन्या अद्ययावत कराव्यात
- वीजपुरवठ्यातील चढ- उताराचा डाटा घेऊन त्याचे विश्लेषण करावे
- रस्त्यांवरील अतिक्रमणे काढावीत

# मिशन 'चकाचक'साठी चार नवी स्वीपर मशीन; स्वच्छेतेसाठी पालिकेचा यांत्रिकीकरणावर भर

पुणे : शहर स्वच्छतेसाठी पालिकेच्या ताफ्यात चार व्हॅक्यूम ऑपरेटेड रोड स्वीपर मशिन्स आली आहेत. त्याचा वापर रस्ते, फुटपाथ, सायकल मार्ग, कचरा कुंड्या, दुभाजक आणि स्ट्रीट फर्निचरच्या सफाईसाठी होणार आहे. पालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते शुक्रवारी रात्री या मशिनचे लोकार्पण झाले. यावेळी अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., ओमप्रकाश दिवटे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संदीप कदम, तसेच ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंटचे दिप सिंग उपस्थित होते.



पालिकेकडून एकूण १२ स्वीपिंग मशिनद्वारे सफाई होणार असून, त्यापैकी चार मशिनचा वापर शुक्रवार रात्रीपासून सुरू झाला. शहराच्या विस्तारामुळे पालिकेचे क्षेत्रफळ सुमारे ५१६ चौ. कि.मी.पर्यंत वाढले आहे. लोकसंख्या सुमारे ७० ते ८० लाखांवर पोहोचल्याने स्वच्छतेसाठी यांत्रिकीकरण आवश्यक झाले आहे. केंद्राच्या सूचनेनुसार १८ मीटरपेक्षा रुंद रस्त्यांवर रोड स्वीपरचा वापर करणे बंधनकारक आहे. त्यामुळे पीएम २.५ व पीएम १० या सूक्ष्मधूळ कणांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.

असे होणार काम :

पालिकेने निश्चित केलेल्या रस्त्यावर एक मेकॅनिकल रोड स्वीपर, ११ कामगार, २ पेव्हमेंट स्वीपर, २ लीफ ब्लोअर, १ ग्रास कटर, जेटिंग मशिन आणि १ छोटा हत्ती (सीएनजी टिपर) तैनात राहणार आहेत. यंत्रांद्वारे दररोज सुमारे ४० किमी क्षेत्राची स्वच्छता केली जाणार आहे. रात्री १० ते सकाळी ६ या वेळेत झोन क्र. १ ते ४ मधील रस्त्यांची सफाई होईल.स्ट्रीट फर्निचर, दुभाजक ग्रिल्स, सायकल मार्ग, फुटपाथ आदी ठिकाणांचीही स्वच्छता होईल. या मेकॅनिकल स्वीपिंग मशिनमध्ये ६.५ क्युबिक मीटर क्षमतेचा कचरा हॉपर व ३००० लिटर पाण्याची टाकी आहे. वॉशर व स्प्रिंकलर यंत्रणा धूळ कमी करण्यासाठी स्वच्छतेच्या एक तास आधीच कार्यरत केली जाईल. त्यामुळे रस्त्यावर धुळीचे प्रमाण कमी होईल.

# विघ्नहर साखर कारखान्याचे मील रोलर पूजन उत्साहात संपन्न

ओझर: जुन्नर तालुक्यातील श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्यामध्ये गाळप हंगाम २०२५-२६ साठी मील रोलर पूजन शनिवारी सकाळी १० वाजता उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या प्रसंगी कारखान्याचे चेअरमन सत्यशील शेरकर, व्हाइस चेअरमन अशोक घोलप, कार्यकारी संचालक भास्कर घुले, सर्व संचालक मंडळ सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.




चेअरमन सत्यशील शेरकर यांनी सांगितले की, आगामी गाळप हंगामासाठी मशिनरी देखभाल व दुरुस्तीची कामे वेगाने सुरू असून ऑक्टोबर २०२५ मध्ये कारखाना गाळपासाठी पूर्णपणे सज्ज होईल. तसेच, सहवीज निर्मिती आणि डिस्टीलरी प्रकल्पांची कामेही प्रगतीपथावर आहेत. यंदा शेतकऱ्यांचा ऊस लागवडीकडे मोठा कल दिसत असून, कारखान्यामार्फत आडसाली ऊसासाठी बियाणे पुरवठा प्रक्रिया सुरू आहे. कारखान्याची दैनंदिन गाळप क्षमता ५,००० मे. टनावरून ७,५०० मे. टनांवर वाढवण्यात आली असून, हंगाम २०२५-२६ मध्ये प्रतिदिन ८,५०० ते ९,००० मे. टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट आहे. शेतकऱ्यांनी आडसाली, पूर्वहंगामी आणि सुरू ऊस लागवड मोठ्या प्रमाणात करावी, जेणेकरून ऊस तोडणीचे नियोजन प्रभावीपणे करता येईल, असे आवाहन शेरकर यांनी केले.

याशिवाय, कारखान्यामार्फत शेतकऱ्यांना हिरवळीचे खत म्हणून ताग बियाणे आणि विघ्नहर कृषी अमृत सेंद्रिय खताचे वाटप सुरू आहे. शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. गाळप हंगाम २०२५-२६ साठी कारखान्याचे १३ लाख मे. टनांहून अधिक ऊस गाळपाचे उद्दिष्ट आहे. ऊस तोडणी आणि वाहतूक लेबरचे नियोजन करारानुसार सुरू असून, ६५ केएलपीडी क्षमतेचा डिस्टीलरी प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणार असल्याचे शेरकर यांनी स्पष्ट केले. या पूजन सोहळ्याने कारखान्याच्या आगामी हंगामाच्या तयारीला उत्साहपूर्ण सुरुवात झाली आहे.

# शहरात पाच नवीन सायबर ठाणी उभारावीत; आमदार सिद्धार्थ शिरोळे यांची मागणी

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील सायबर गुन्ह्यांचा तपास लवकर लागण्यासाठी पाच विभागांमध्ये नवीन सायबर पोलीस ठाणी निर्माण करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी द्यावी, अशी मागणी आमदार शिरोळे यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे गुरुवारी विधानसभेत केली. सायबर चोरटे वेळोवेळी नागरिकांची फसवणूक कशा पद्धतीने करतात, याची उदाहरणे आमदार शिरोळे यांनी सभागृहात दिली.




सायबर गुन्ह्यांच्या पद्धतीविषयी माहिती देणारा प्रशिक्षित स्टाफ पोलीस ठाण्यांमध्ये नेमला जावा. शालेय विद्यार्थ्यांनाही सायबर गुन्ह्यांची माहिती देऊन प्रशिक्षित केले जावे. डिजिटल फॉरेन्सिक विभागाला भरीव निधी दिला जावा. व्हीपीएन नेटवर्क आणि म्युल अकाउंट शोधण्याची यंत्रणा अधिक सक्षम केली जावी, अशा सूचना आ. शिरोळे यांनी केल्या.

सायबर गुन्ह्यांमध्ये आर्थिक फसवणूक मोठ्या प्रमाणात केली जाते.

विदेशात चोरट्यांनी म्युल अकाउंट काढलेले असतात, ती शोधणे किंवा व्हीपीएन नेटवर्क ट्रॅक करणे शासकीय यंत्रणेला शक्य होत नाही. यासाठी देशांतर्गत राज्यांमध्ये तपास यंत्रणांमध्ये समन्वय साधला गेला पाहिजे आणि ज्या देशात सायबर घोटाळे जास्त होतात, त्या देशात गेलेला पैसा शोधून परत आणण्यासाठी आंतरराष्ट्रीय सायबर करार गरजेचा आहे, असे सांगून यासाठी केंद्र सरकारला प्रस्ताव पाठवावा, अशी मागणी आ. शिरोळे यांनी केली.

सायबर गुन्ह्यातील चोरटे पकडले जातात पण, पैसे परत मिळत नाहीत, यासाठी 'रिटर्न ऑफ स्टोलन प्रॉपर्टी' साठी धोरणात्मक निर्णय घेणार का? अशी विचारणा आमदार शिरोळे यांनी केली. सायबर घोटाळ्याच्या तपासासाठी बँकांनी पोलिसांना लगेचच सहकार्य करावे, यासाठी बँकांनाही सूचना दिल्या जाव्यात, असे आ. शिरोळे यांनी सांगितले.

# निवडणुकीनंतर अवघ्या दोन वर्षात चौकशी समिती; बाजार समितीच्या कारभारात शेतकरी पूर्णत:

पुणे । प्रतिनिधी

पुणे जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मागील दोन वर्षातील गैरकारभाराची चौकशी करण्यासाठी विशेष समितीची नेमणूक करण्यात आली आहे. परंतु, संचालक मंडळाची चौकशी होणे हे काही नविन नाही. किंबहुना बाजार समितीवर प्रशासकीय कार्यकाळ वगळता मागील काही वर्षांत जेंव्हा जेंव्हा संचालक मंडळाकडे कारभार आला तेंव्हा गैरकारभाराच्या कारणातून शासनाला चौकशी समिती नेमावी लागली आहे.

संचालक मंडळासाठी १९ वर्षांनंतर झालेल्या निवडणुकीनंतर कारभार सुरळीत चालेल अशी अपेक्षा असताना पुन्हा गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी पुन्हा समिती नेमण्याची वेळ शासनावर आली आहे.

प्रशासकीय कारभाराचा कालावधी

बाजार समितीच्या कथित गैरकारभार प्रकरणांमुळे पहिल्यांदा दि. ३ फेब्रुवारी २००२ मध्ये जिल्हा उपनिबंधक गितेशचंद्र साबळे यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यानंतरच्या काळात सर्वाधिक म्हणजे नऊ वर्षे बी.जे. देशमुख यांनी प्रशासक म्हणून बाजार समितीचा कारभार पाहिला. सहकार खात्यातील उपनिबंधक शैलेश कोथमिरे यांनीही प्रशासकीय काळ गाजविला.

उच्च न्यायालयाचे निवडणूक घेण्याचे आदेश असतानाही जिल्हा उपनिबंधकांच्या आदेशानुसार प्रादेशिक बाजार समितीच्या विभाजनाच्या प्रस्तावानुसार पणन संचालकांनी निवडणुकीऐवजी बाजार समितीचे विभाजन करीत पुन्हा प्रशासकपदी देशमुख यांना कायम ठेवले तर, हवेली बाजार समितीवर



आनंद कटके यांची प्रशासक म्हणून वर्णी लागली. त्यामुळे बाजार समित्या प्रशासकांनीच चालवायच्या का, अशी आरडाओरडा सुरू झाली.

असाही कालावधी

बाजार समितीत कथित गैरव्यवहारातून तत्कालीन संचालक मंडळ २००२ मध्ये बरखास्त करण्यात आले. पदाधिकाऱ्यांचे राजकीय पुनर्वसन होत नसल्याने शेतकरी हिताचा मुद्दा पुढे करीत प्रशासकांना प्रचंड विरोध तर निवडणूक घेण्याची जोरदार मागणी होत होती. त्याच दरम्यान बाजार समितीमध्ये एक ऑक्टोबर १९९९ ते १९ ऑगस्ट २००२ दरम्यान झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याचे आदेश तत्कालीन पणन संचालकांनी मे. मुलाणी आणि कंपनी या संस्थेने चौकशी अहवालावरून दिले होते.

तत्कालीन जिल्हा उपनिबंधक डॉ. संजय भोसले यांनी १६ संचालकांकडून वसुलीचा आदेश एप्रिल २००३ मध्ये दिला होता. मात्र, त्यापैकी आठ संचालकांकडून रक्कम वसुलीचा आदेश तत्कालीन पणन संचालकांनी रद्द केला तर अन्य चार संचालकांचा अर्ज फेटाळला होता. तर, मुलाणी आणि कंपनी यांचाच अहवाल ग्राह्य धरीत फेरचौकशीचे आदेश पुणे जिल्हा उपनिबंधकांनी दिल्याने सर्वच संचालकांची चौकशी सुरू झाली होती. यातून काही माजी संचालक उच्च न्यायालयात गेले. न्यायालयाने याचिका फेटाळली, त्यानंतर फेरचौकशीची केवळ चर्चाच होत राहिली.

निवडणुकीनंतर अवघ्या दोन वर्षात

बाजार समितीच्या संचालकांची २००३ मध्ये फेरचौकशी सुरू झाल्यानंतर मोठा कालावधी यामध्ये गेला. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने बाजार समित्यांच्या निवडणुका घेण्यावरील स्थगिती उठविल्यानंतर तब्बल १९ वर्षे प्रशासकीय कार्यकाळ असलेल्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीचा कार्यक्रम २०२३ मध्ये जाहीर झाला.

जिल्हा उपनिबंधकांनी आर्थिक अनियमितता आणि गैरव्यवहार या कारणांमुळे २००३ मध्ये संचालक मंडळ बरखास्त केले होते. त्यानंतर तब्बल १९ वर्षे या बाजार समितीवर प्रशासकीय कारभार होता. २०२३ मध्ये नव्याने संचालक मंडळ सत्तेवर येताच अवघ्या दोन वर्षांतच पुन्हा कथित गैरव्यवहाराच्या कारणाने संचालक मंडळाची चौकशी सुरू झाली आहे.